Ministry of Panchayati Raj
Government of India

# ग्रामोदय संकल्प



श्री गिरीराज सिंह
केंद्रीय पंचायती राज आणि ग्रामविकास मंत्री ना



श्री नरेंद्र मोदी
पंतप्रधान



श्री कपिल मोरेश्वर पाटील
केंद्रीय राज्यमंत्री, पंचायत राज

## पंचायतींमध्ये शाश्वत विकास लक्ष्यांचे स्थानिकीकरण

सशक्त पंचायत सतत् विकास















आवृत्ती- १३

**या आवृत्तीमध्ये**

- शाश्वत विकास उद्दिष्टे: जागतिक पातळीवर विचार करणे स्थानिक पातळीवर कार्य करणे
- सुधारित राष्ट्रीय पंचायत पुरस्कार
- शाश्वत विकासाचे स्थानिकीकरण: शैक्षणिक उद्दिष्टे

# भारताच्या राष्ट्रपतींचा स्वच्छ भारत दिवस साजरा करण्यासहिरवा कंदिल

## सरकार प्रत्येक घरात नळाचे पाणी, शौचालये आणि वीज पुरवठा करण्याचे ध्येयगाठण्यासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे: श्री गिरीराज सिंह, केंद्रीय पंचायती राज आणि ग्रामविकास मंत्री




नवी दिल्ली येथे 2 ऑक्टोबर 2022रोजी, गांधी जयंती निमित्त जलशक्ती मंत्रालयाने 'स्वच्छ भारत दिवस' साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात,भारताच्या राष्ट्रपतीश्रीमती द्रौपदी मुर्मू सहभागी झाल्या होत्या. तिथेत्यांनी विविध श्रेणीं अंतर्गत'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण पुरस्कार' प्रदान केले.
या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रपतींनी राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली.

यावेळी राष्ट्रपतीम्हणाल्या की,गांधीजींचे विचार चिरंतन आहेत. सत्य आणि अहिंसेप्रमाणेच गांधीजींनी स्वच्छतेवरही भर दिला होता.त्यांच्या स्वच्छतेच्या संकल्पाचे उददिष्ट सामाजिक विकृती दूर करून नवीन भारत घडवणे हे होते.

त्यामुळे त्यांचीजयंती स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरीकरणे, ही त्यांना खरी श्रद्धांजली आहे. 2014 मध्ये स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण सुरू झाल्यापासून 11 कोटींहून अधिक शौचालये बांधण्यात आल्याचे आणि सुमारे 60 कोटी लोकांनी उघड्यावर शौचास जाण्याची आपली सवय बदलल्याचे राष्ट्रपतींनी नमूद केले.भारताने 2030 या अंतिम मुदतीच्या अकरा वर्षे आधीचUN चे शाश्वत विकासाचे लक्ष्य क्रमांक 6 या मिशनच्या माध्यमातून गाठल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमाला केंद्रीय पंचायती राज आणि ग्रामविकास मंत्री श्री गिरीराज सिंह हे सुद्धा उपस्थित होते.स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण बद्दल बोलताना ते म्हणाले की, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली 11 कोटींहून अधिक शौचालये बांधली गेली आहेत आणि ग्रामीण कुटुंबांमध्ये 10 कोटींहून अधिक नळ जोडणीकरण्यात आली आहे.केंद्रीय मंत्री म्हणाले की, भारत जन भागिदारी आंदोलनासोबतच स्वच्छ भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने काम करत आहे.

केंद्रीय मंत्री ने ये भी कहा कि भारत जनवरी से स्वच्छ भारत के लक्ष्य को प्राप्त करने की दिशा में भागीदारी आंदोलन के माध्यम से काम कर रहा है साथ ही स्वच्छता के लिए यह जन आंदोलन देश के हर एक कोने तक पहुंचना चाहिए।
श्री सिंह ने आगे कहा कि सरकार नल का पानी, शौचालय और बिजली हर घर में उपलब्ध कराने के लक्ष्य को प्राप्त करने की दिशा में ईमानदारी से काम कर रही है।

स्वच्छतेसाठीचे हे जनआंदोलन देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.प्रत्येक घरात नळाचे पाणी, शौचालये आणि वीज उपलब्ध करून देण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी सरकार प्रामाणिकपणे काम करत आहे, असे श्री सिंह म्हणाले.
पंचायती राजचे सचिव, श्री सुनील कुमार आपल्या भाषणात म्हणाले की, लोकसहभाग हा जल जीवन मिशन आणि ओडीएफ प्लसमधील सर्वात महत्त्वाचा पैलू आहे.या दोन्ही योजनांच्या देखभालीची जबाबदारी ग्रामपंचायतींचीअसल्याचे ते म्हणाले.
सेवा प्रदात्याने चांगल्या सेवा दिल्या तर लोक सेवा शुल्क भरण्यास तयार असल्याचेही त्यांनी नमूद केले.ते म्हणाले, की पंचायती पुढे येऊन राज्य प्राधिकरणांच्यामदतीने रहिवाशांना ही सेवा शक्य तितक्या सुलभ पद्धतीने देण्यासाठी सज्ज आहेत.

# सामग्री सारणी


**मुख्य संपादक:**

**सुनील कुमार, आय.ए. एस.**
सचिव, पंचायती राज मंत्रालय

**संपादक:**

**डॉ. बिजय कुमार बेहेरा, आई. ई. एस.**
आर्थिक सल्लागार, पंचायती राज मंत्रालय

**सहयोग :**

आलोक पंड्या
अंजनी कुमार तिवारी



3

मंत्र्यांचा संदेश

4

राज्यमंत्र्यांचा संदेश

5

सचिवांचा संदेश

17

शिक्षणासाठी शाश्वत विकास ध्येयाचे स्थानिकीकरण

21
सुधारित राष्ट्रीय पंचायत पुरस्कार

25

पंचायतीमध्ये विषयवार दृष्टिकोनातून शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणा (एलएसडीजी) साठी 2 दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा

32

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय पुरस्कारा ने सन्मानित

भारताच्या राष्ट्रपतींचा स्वच्छ भारत दिवस साजरा करण्यास हिरवा कंदिल 01

SDG चे स्थानिकीकरण स्थानिक विकासाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आहे: लोकल इंडिकेटर फ्रेमवर्क (LIF) आणि पंचायतीसाठी डॅशबोर्ड 12

पंचायतींचा शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणाच्या दिशेने प्रवास 23

शाश्वत विकासासाठी संयुक्त राष्ट्रांचा अजेंडा 2030 ती प्रत्यक्षात आणण्यासाठी गरिबीमुक्त ग्रामपंचायतींवर राष्ट्रीय कार्यशाळा 28

## गिरिराज सिंह
**GIRIRAJ SINGH**





ग्रामीण विकास तथा पंचायती राज मंत्री
भारत सरकार
कृषि भवन, नई दिल्ली
MINISTER OF
RURAL DEVELOPMENT AND PANCHAYATI RAJ
GOVERNMENT OF INDIA
KRISHI BHAWAN, NEW DELHI


# संदेश

एपंचायती राज मंत्रालय 'ग्रामोदय संकल्प' मासिकाचा 13 वा अंक 'पंचायतींमध्ये शाश्वत विकास लक्ष्यांचे स्थानिकीकरण' या विषयासह प्रकाशित करत आहे, याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे.

2030 अजेंड्यावर शाश्वत विकासासाठी स्वाक्षरी करणारा म्हणून, भारत 17 शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वचनबद्ध आहे. भारत सरकार 2030 अजेंडा आणि राष्ट्रीय विकास उद्दिष्टे, तसेच "सब का साथ, सब का विकास" किंवा "सर्वांचा आणि सर्वांसाठी विकास " या सर्वसमावेशक विकासाच्या उद्दिष्टांसाठी वचनबद्ध आहे.

भारताचा जवळजवळ 68% भाग हा ग्रामीण भारताने व्यापलेला आहे आणि महात्मा गांधीजींच्या शब्दात- भारताचे हृदय खेड्यांमध्ये वसते, हे लक्षात घेऊन, राष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मुलभूत पातळीवर म्हणजेच पंचायत पातळीवर कृती करणे आवश्यक आहे. एकात्मिक ग्रामीण विकासामध्ये 9 विषयांतर्गत समाविष्ट केलेल्या 17 शाश्वत विकास उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करून दारिद्र्यमुक्त आणि प्रगत उपजीविका, निरोगी, मुलांना अनुकूल,मुबलक पाणी, स्वच्छ आणि हरित, स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा, सामाजिकदृष्ट्या सुरक्षित आणि न्याय्य, सुशासित आणि महिला अनुकूल गावे, 2030 च्या लक्ष्य वर्षापर्यंत सुनिश्चित करण्यात पंचायतींची निर्णायक भूमिका आहे. ग्रामोदय संकल्पच्या या अंकात SDGs च्या स्थानिकीकरणाच्या कल्पना, त्याची आखणी, कृती आराखडा आणि उपलब्धी यांचा समावेश आहे.

मला खात्री आहे, की पंचायतींमधील शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणावर आधारित ग्रामोदय संकल्पाचा हा अंक, पंचायती, निवडून आलेले पंचायत प्रतिनिधी आणि पदाधिकारी तसेच सामान्य जनतेला हा जागतिक अजेंडा स्थानिक दृष्टिकोनासह समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि तो साध्य करण्यासाठी ते प्रयत्नशील असतील.

**(गिरिराज सिंह)**


Office : 'G' Wing, Ground Floor, Krishi Bhawan, New Delhi-110001, Tel.: 011-23383548, 23782373, 23782327, Fax : 011-23070309
Resi.: 27, Lodhi Estate, New Delhi, Ph.: 011-24626783, 24655677

कपिल मोरेश्वर पाटील
राज्यमंत्री
पंचायती राज मंत्रालय
भारत सरकार

सत्यमेव जयते

**KAPIL MORESHWAR PATIL**
MINISTER OF STATE
MINISTRY OF PANCHAYATI RAJ
GOVERNMENT OF INDIA



## संदेश

पंचायती राज मंत्रालयातर्फे 'पंचायतींमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांचे स्थानिकीकरण' या विषयावर 'ग्रामोदय संकल्प'चा 13 वा अंक प्रकाशित होत आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे.

भारत शाश्वत विकासासाठी 2030 अजेंडावर स्वाक्षरी करणारा म्हणून, 17 शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वचनबद्ध आहे. भारतातील जवळपास 68% लोक खेड्यांमध्ये राहतात ही वस्तुस्थिती ओळखून, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मुलभूत पातळीवर कृती करणे आवश्यक आहे, जसे की पंचायती राज संस्थांमार्फत SDG चे स्थानिकीकरण.

यासाठी, पंचायती राज मंत्रालयाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी SDGs च्या स्थानिकीकरणाचे थीमॅटिक फ्रेमवर्क स्वीकारले आहे जेणेकरून त्या त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी आणि दारिद्र्यमुक्त आणि प्रगत उपजीविकेच्या पंचायती तयार करण्यासाठी असमानता आणि अन्यायाशी लढा देताना पाण्याच्या मुबलकतेसह निरोगी जीवन सुनिश्चित करतील आणि 'सर्वसमावेशक विकासा' द्वारे 2030 पर्यंत ग्रामीण भारतामध्ये होणारे हवामान बदलाचे हानिकारक परिणाम कमी करण्यासाठी कार्य करतील. ग्रामोदय संकल्पच्या या अंकात SDGs च्या स्थानिकीकरणाच्या कल्पना, त्याची आखणी, कृती आराखडा आणि उपलब्धी यांचा समावेश आहे.

मला खात्री आहे की LSDGs वर आधारित ग्रामोदय संकल्पाचा हा अंक पंचायती, निवडून आलेले पंचायत प्रतिनिधी आणि पदाधिकारी तसेच सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरेल.

(कपिल मोरेश्वर पाटील)

**Office:** Room No. 392, 'E' Wing, 3rd Floor, Krishi Bhawan, New Delhi-110001
**Residence:** 05, Duplex North Avenue, New Delhi-110001
Phone: 011-23782143, 23782548, 23782518 E-mail Id: mospanchayatiraj@gmail.com

सुनील कुमार, IAS
सचिव
**Sunil Kumar, IAS**
**Secretary**

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

भारत सरकार
पंचायती राज मंत्रालय
डॉ. राजेन्द्र प्रसाद रोड,
कृषि भवन, नई दिल्ली–110001
Government of India
Ministry of Panchayati Raj
Dr. Rajendra Prasad Road,
Krishi Bhawan, New Delhi-110001



## संदेश

ग्रामोदय संकल्प मासिकाचा 13 वा अंक मंत्रालयाच्या 'शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणा (LSDGs) ' वरील पुढाकार आणि प्रयत्नांना समर्पित आहे, ज्यामध्ये पंचायती प्रमुख सक्रिय भागीदार आहेत, हे लक्षात घेऊन मला अतिशय आनंद होत आहे.

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) सर्वांसाठी एक उत्तम, अधिक न्याय्य आणि शाश्वत भविष्य साध्य करण्याची ब्लू प्रिंट आहे. 2015 मध्ये, शाश्वत विकासासाठी 2030 च्या अजेंड्याचा भाग म्हणून सर्व UN सदस्य राष्ट्रांनी 17 SDGs आणि 169 संबंधित लक्ष्ये स्वीकारली आणि त्यावर स्वाक्षरी केली. भारत सरकारसुद्धा युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट 2030 अजेंड्यावर स्वाक्षरी करणार आहे.

जवळपास 68% भारत ग्रामीण भागात राहतो हे लक्षात घेता, राष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पंचायती राज संस्थांद्वारे (PRIs) मुलभूत पातळीवर कृती आवश्यक आहे. म्हणून, SDGs च्या स्थानिकीकरणात PRIS ची, विशेषतः ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यानुसार, पंचायती राज मंत्रालयाने SDC बद्दल विषयात्मक दृष्टीकोन स्वीकारला आहे ज्याद्वारे सर्व 17 SDG ना 9 विषयांमध्ये पुन्हा गटबद्ध केले आहे. यातील प्रत्येक विषयामध्ये एकापेक्षा जास्त SDGs समाविष्ट आहेत, ज्याची प्राप्ती विविध मंत्रालयांच्या योजना आणि कार्यक्रमांद्वारे सामूहिक कृतीवर अवलंबून असते.

मुलभूत पातळीवर SDGs साध्य करण्याच्या दृष्टिने पंचायतींची क्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांना सर्व संभाव्य संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी मंत्रालयाकडून सातत्याने ठोस आणि नवीन पावले उचलली जात आहेत.

सुधारित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (RGSA) च्या योजनेचे लक्ष पंचायती राज संस्थांची स्थानिक स्वराज्य संस्थांची जीवंत केंद्रे म्हणून पुनर्रचना करण्यावर आणि केंद्रीय मंत्रालये, राज्य रेखा विभाग आणि इतर भागधारक यांच्या एकत्रित आणि सहयोगी प्रयत्नांद्वारे 'संपूर्ण सरकार' आणि 'संपूर्ण समाज' दृष्टिकोनातून विषयात्मक दृष्टिकोनाचा अवलंब करून मुलभूत पातळीवर SDG प्रत्यक्षात आणण्यावर आहे.

SDGs च्या स्थानिकीकरणाची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी, मुलभूत पातळीवर भागधारकांचे लक्ष वेधण्यासाठी केंद्रीय मंत्रालये, राज्य सरकार, यूएन एजन्सी, शैक्षणिक संस्था, CSO आणि इतरांसह एकत्रितपणे काम करणाऱ्या मध्यस्थांची साखळी तयार केली जात आहे.

ग्रामोदय संकल्पच्या या अंकात, सर्व भागधारकांना संवेदनशील करण्यासाठी LSDGs वर MoPR ने आयोजित केलेल्या कार्यक्रमांच्या माहितीसह शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणावरील माहितीपूर्ण आणि संक्षिप्त लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

मला आशा आहे, की हा अंक पंचायत प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि ग्रामीण जनतेला LSDG बद्दल जाणून घेण्यासाठी आणि LSDG चे लक्ष्य गाव पातळीवर साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

(सुनील कुमार)

Tel.: 011-23389008, 23074309 • Fax: 011-23389028 • E-mail: secy-mopr@nic.in

# जागतिक पातळीवर विचार करून स्थानिक पातळीवर कार्य करा

मते: श्री एस.एम.विजयानंद [1]
डॉ आर रमेश, सहयोगी प्राध्यापक, सीआरआय [2]

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs),ही मानवाने स्वतःसाठी निश्चित केलेली अतिशय महत्त्वाकांक्षी विकास उद्दिष्टे आहेत आहेत. यात संपूर्ण मानवतेचा समावेश होतो. यामध्ये 17 गोल आहेत. जे क्रॉस-सेक्टरल आहेत.ते एकमेकांशी जोडले गेले असून ते 'थिंक ग्लोबली अँड अक्ट लोकली (जागतिक पातळीवर विचार करून स्थानिक पातळीवर कार्य करा)' या तत्त्वज्ञानाला मूर्त स्वरूप देतात.जरी हे आंतरराष्ट्रीय स्तरावर ठरवले गेले असले आणि भारताने त्याला मान्यता दिली असली तरी, कामाची सुरुवात - ग्रामपंचायत स्तरावर आधुनिक पद्धतीने झाली पाहिजे.

आता, आमच्यासाठी स्पष्ट ध्येय ठरवण्यात आले आहे. लक्ष्य निश्चित केले आहे. त्यासाठी आधी राष्ट्रीय उद्दिष्टे निश्चित होतील, जी नंतर राज्यांपर्यंतपोहोचवली जातील, त्यानंतर एकात्मिक कामगिरी देखील मांडली जाईल. ही एक प्रक्रिया आहे, पण जेव्हा ग्रामपंचायतीचे काम सुरू होते तेव्हा आपल्याला अशा गोष्टींकडे लक्ष द्यावे लागत नाही. आपण वेगवेगळ्या उद्दिष्टां संदर्भात आपल्याला काय करतायेईल, यावर लक्ष केंद्रित करूया.

ज्याला आपण शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची वैशिष्ट्ये म्हणले पाहिजे, त्यामध्ये बरेच बारकावे आहेत. (1) ते सार्वत्रिक आहेत. कोणीही यात मागे राहू नये यासाठी आमच्या अंत्योदयच्या राष्ट्रीय तत्त्वज्ञानानुसार सर्वात गरीब, सर्वात दूरच्या आणि शेवटच्या व्यक्तीपर्यंत हे पोहोचवता यावेत, असा यामागचा गांधीवादी दृष्टिकोन आहे.
(2) यानंतर समावेशकतेच्या मूल्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते, शांतता ज्याविषयी आपण सहसा विकासा संदर्भात चर्चा करताना बोलत नाही.त्यानंतर संस्थांवर लक्ष केंद्रित केले जाते - आणि विशेषतःग्रामपंचायत ही अशी संस्था आहे, जिचा भारता संदर्भात आपण उल्लेख करू शकतो. (3) यामध्ये शासनावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे सुशासन म्हणजे "माझ्या स्वप्नातील स्वराज्य हे गरीब माणसाचे स्वराज्य आहे". त्यालाच त्यांनी पूर्ण स्वराज म्हटलेआहे. आता आपण स्वतः राज्य/शासन चालवायला शिकले पाहिजे. ते भ्रष्टाचारमुक्त कारभाराबद्दलही बोलतात. त्यामुळे SDGs ही ध्येयांची विस्तृत श्रेणी आहे.

आता सुरुवात कुठून करायची? आम्ही ग्रामपंचायत स्तरावर सुरुवात करतो. यासाठी कोणत्याही लेखी सूचनांची वाट पाहायला नको.आम्ही सुरुवात केली आहे. सुरुवात करणे सगळ्यात महत्त्वाचे आहे, कारण आमच्याकडे ध्येय गाठण्यासाठी अजून आठ वर्षे आहेत. पण कामाला गती मिळण्यासाठी थोडा वेळ लागेल.आपण सुरुवात कशी करायची? आमच्याकडे पंचायतींच्या संभाव्य कार्याची माहिती देणारे वेळापत्रक आहे. प्रथमत्यावर सर्व SDGs ची आखणी करूया.मग तुम्हाला दिसून येईल, की यात बरेच सामान घटक आहेत. पुढील गोष्टींवर या. संबंधित राज्य कायद्यांतर्गत पंचायतींना दिलेल्या कार्यांवर त्यांचीआखणी करा.मग ते सर्वज्ञात आणि सर्वमान्य होते. ही कार्ये बहुतेक करून कायद्यानुसारच असतात, परंतु अनेकदा कार्यान्वित होत नाहीत. चला तर मग आता जाणून घेऊया पंचायतींचे नेमके काम काय आहे? ते नक्की काय कामगिरी करत आहेत? आणि त्यावरSDGs चीआखणी करा. त्यामुळे तुम्हाला काही समान क्षेत्रे सापडतील. हे तेच क्षेत्र आहे, जिथे आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे.चे हैं। हमें ये ध्यान रखना चाहिए कि रफ्तार पकड़ने में थोड़ा समय लगेगा। हम प्रारंभ कैसे करें? हमारे पास पंचायतों के संभावित कार्यों का विवरण देने वाली संविधान की अनुसूची है।

आता आपल्या देशात बरेच अधिकारांवर-आधारित कायदे आहेत. भारत हा अधिकारांवर आधारित कायदे बनवण्यात अग्रेसर देश आहे. आपल्याकडे माहितीचा अधिकार आहे, कामाचा अधिकार आहे, शिक्षणाचा अधिकार आहे, अन्नाचा अधिकार आहे आणि अलीकडेच आपण यात अपंग इत्यादी व्यक्तींसंबंधित अधिकार जोडले आहेत. या अधिकारांवर-आधारित कायद्यांवर सगळ्या SDGs चीआखणी करा. पंचायतींची याकायद्यांच्या अंमलबजावणीत आणि विशेषतः SDG निर्देशकांवरील प्रगतीचे निरीक्षण करण्यात खूप महत्त्वाची भूमिका असते. अशी आखणीसुद्धा खूप किचकट आहे.

पंचायतींमार्फत वेगवेगळ्या राज्यांमध्ये अनेक योजना राबवल्या जात आहेत.त्या योजनांनुसारSDGs चीआखणी करा. याशिवाय, आम्ही ग्रामपंचायत विकास योजने (GPDP) अंतर्गत, 15 व्या वित्त आयोगाच्या अनुदानाचा वापर करून बरेच कार्यक्रम घेतले आहेत.त्यांच्याSDGs चीआखणीकरा.तुम्ही हे केल्यानंतर, 'गव्हर्नन्स' किंवा 'ई-गव्हर्नन्स' नावाची एक सामान्य गोष्ट आहे.सुशासनामध्ये सामाजिक लेखापरीक्षण, उत्तरदायित्व, पारदर्शकता इत्यादी घटक असतात. त्यावरआधारीत SDGs चीआखणी करा.एकदा तुम्ही हीआखणी केली, की राज्य पंचायती SDGs साठी काय करू शकतात याचा आढावा तुमच्याकडेअसेल. तुम्हाला काय करतायेईल, हे ठरवण्याची ही पहिली पायरी आहे.

[1] भारत सरकार, यांचीअसून
[2] राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायती राज संस्था (NIRDPR), हैदराबाद.

मध्यवर्ती आणि जिल्हा स्तरावरील पंचायती देखील अशीआखणी करू शकतात. पण सर्वात आधी ग्रामपंचायतींनी स्वत:च्या सामर्थ्यावर लक्ष केंद्रित करावे, असा आग्रह मी धरतो.ग्रामपंचायतींची ताकद काय आहे? त्यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे ते लोकांसमोर आहेत. त्यांना समस्या माहित आहेत. सामाजिक-आर्थिक स्तराच्या आधारावर कोणत्या गटांना प्राधान्य देणे आवश्यक आहे, हे त्यांना माहीत आहे. त्यामुळे, ते आपल्याला ही उद्दिष्टे खऱ्या अर्थाने साध्य करण्यासाठी उपाययोजना देऊ शकतात. यासाठी तुमचा सहभाग आणि सामूहिक स्थानिक कृती आवश्यक आहेत. ग्रामपंचायतींना हे उत्तम प्रकारे करता येईल.कारण 'दुर्गम लोकांपर्यंत पोहोचणे' ही गोष्ट ग्रामपंचायती खूप चांगल्या प्रकारे करू शकतात.

या उद्दिष्टांचीप्राप्तीएकाच पातळीवर नाही. ते देशात किंवा जगात कुठेही समान पातळीवर नाहीत.अगदी एकाच जिल्ह्यादेखील प्रचंड तफावत दिसून येते. केवळ ग्रामपंचायतींद्वारेच विकासाला त्या पातळीवर जोडतायेईल.मग स्वच्छता, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) यासारख्या काही गोष्टींमध्ये गरीब ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचण्याचे काही फायदे निश्चित आहेत. यात ग्रामपंचायतींची सदस्य संख्या सुमारे 30 लाख किंवा 3 दशलक्ष आहे, त्यापैकी सुमारे 13 लाख ते 14 लाख महिला आहेत आणि त्या SDGs साठी फ्रंटलाइन स्वयंसेवक किंवा फ्रंटलाइन ॲक्शन स्वयंसेवक असतील.

सामान्यतः यापैकी बरेच SDGs सहस्राब्दी विकास उद्दिष्टे (MDGs) पेक्षा वेगळे असतात. SDGs सामाजिक भांडवल उभारणीसाठी ज्या पैलूंची मागणी करतात,त्या पैलूंची मांडणी ग्रामपंचायतींना अधिक चांगल्या प्रकारे करता येईल.यापैकी अनेक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विस्तार खूप महत्त्वाचा आहे. ग्रामपंचायतींना कुठल्याही क्षेत्रात, विशेषत: सामाजिक क्षेत्रात वेगळा फायदा आहे.त्यासाठी कृतीच्या प्रभावी मागणीचे निर्माण करणे आवश्यक आहे. हे मागणीचे निर्माणग्रामपंचायतींमार्फत खालच्या पातळीपर्यंत उत्तम प्रकारे करता येईल.

ग्रामपंचायती ऐतिहासिक आणि व्यावहारिकदृष्ट्या हे विभागीय सायलो तोडण्यात अधिक सक्षम आहेत. आपल्याकडे उच्च स्तरावर विभागीयता आहे आणि आपणत्याप्रमाणेच विचार करतो.सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतींची कोणत्याही समस्येचा पूर्ण विचार करून त्यावर उपाय म्हणून शोधण्याची प्रवृत्ती असते. SDGs ठराविक आहेत, जेथे ते क्रॉस-सेक्टरल आहेत,तिथे विभागाच्या पलीकडचा उपाय आवश्यक आहे.

ग्रामपंचायती क्रॉस-सेक्टरल समस्यांवर उपाय शोधण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असतात. त्याठराविक भौगोलिक क्षेत्रासंदर्भात विचार करतात - जसे की तुम्हाला विशिष्ट गट, विशिष्ट ठिकाणे आणि विशिष्ट क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करावे लागेल.अशाप्रकारे, ग्रामपंचायती किंवा ग्रामपंचायतींचागट तोडगा काढण्यासाठी येतील. स्थानिक गरजा आणि स्थानिक प्राधान्ये महत्त्वाचीग्रामपंचायतींसाठी असतात.ग्रामपंचायती उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना ओळखण्यासाठी आणि ओळखण्यासाठी, त्यांचे पोषण करण्यासाठी, आणि अभ्यासाच्या शाळांना प्रोत्साहन देण्यासाठी सुस्थितीत आहेत.

अंमलबजावणी सुरू करण्यापूर्वी, उद्दिष्टांमध्ये समाविष्ट असणाऱ्या महत्त्वपूर्ण विकास संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. तुम्ही त्यांना योग्य दृष्टीकोनातून समजून घेतल्यास, कार्यक्रम घेणे किंवा कृतीचा करणे सोपे होईल.उदाहरणार्थ, 'गरिबीची व्याख्या स्थानिक संदर्भात काय', ही अशी गोष्ट आहे, जी प्रत्येक परिसर, प्रत्येक वयोगटातील प्रत्येक व्यक्तीवर परिणाम करते, जी तुम्ही शोधू शकता.कुपोषित म्हणजे काय? कुपोषण म्हणजे काय? आणि हवामान बदलाचा स्थानिक संदर्भ म्हणजे काय? 'लिंगभेदा' ची समस्या काय आहे? आणि लैंगिक-विविधतेचा स्थानिक संदर्भ किंवा परंपरा ज्ञान म्हणजे काय? समान दर्जाचे शिक्षण म्हणजे काय? या सगळ्याचा उल्लेख SDGs मध्ये आहे.नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन म्हणजे काय? सर्वसमावेशक वाढ म्हणजे काय?या आणि अशा इतर संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न ग्रामपंचायत करत आहे. जसे की 'योग्य काम' आणि 'कामगार हक्क' म्हणजे काय? आर्थिक समावेशन म्हणजे काय; आणि स्थानिक विकासासाठी शांतता किंवा अहिंसा काय करते?या संकल्पनांना अंतर्भूत करणे आवश्यक आहे आणि त्या ग्रामपंचायतींमध्ये चांगल्या प्रकारे अंतर्भूत केल्या जाऊ शकतात.

**आता काही उद्दिष्टे घेऊन आणि ग्रामपंचायती काय करू शकतात ते पाहुया?**

पहिले ध्येय हे गरिबी संदर्भात आहे. मनरेगा हा ग्रामपंचायतीचा विषय आहे आणि त्यात तुम्ही बरेच काही करू शकता.ध्येय-2 हे भूके बद्दल आहे, जे भूक कमी करणे, अन्न सुरक्षा पोषण सुधारणे आणि शाश्वत शेतीशी संबंधित आहे. येथे पुन्हा मनरेगा खूप उपयुक्त आहे.ध्येय-3 हे निरोगी जीवनाबद्दल आहे. कदाचित ग्रामपंचायतींच्या अखत्यारीत रुग्णालये येत नसतील पण ग्रामपंचायती रुग्णालये किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सामान्य लोक यांच्यातील सेवा पुरवण्यासाठीचादुवा होऊ शकतात. त्यामुळे येथेही त्यांचे मोठे योगदान आहे.ध्येय-4 मध्ये जी गोष्ट चांगली आहे तीम्हणजे शिक्षण, प्रवेश निश्चित करणे, गुणवत्ता ठरवणे, कोणीही मागे राहणार नाही याची खात्री करणे. सर्वांना समान दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी ग्रामपंचायती प्रयत्न करू शकतात.

**ध्येय-5** हे लैंगिक समानतेविषयी आहे. ग्रामपंचायती बचत गटांसोबत काम करू शकतात. ग्रामपंचायत सदस्यांपैकी सुमारे 45% महिला सदस्यआहेत. त्यामूळ स्वयंसेवक असू शकतात.

**ध्येय-6** सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता, हा पूर्णपणे ग्रामपंचायतीचा विषय आहे.ग्रामपंचायत विकास आराखडा, जल जीवन मिशन आणि 15 व्या वित्त आयोगाचे अनुदान तसेच मनरेगा निधीचा वापर करून ग्रामपंचायती सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छतेचीसोय करू शकतात आणि यासंबंधित समस्या संपृक्ततेच्या पातळीवर सोडवू शकतात.SDG चे 'कोणीही मागे राहणार नाही' हे तत्त्व येथे अतिशय चांगले लागू होते.

**ध्येय-7** उर्जेविषयी आहे. रस्त्यावरील दिवे आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या पलीकडेही ऊर्जा आहे. व्यवहारीकदृष्ट्या बायोगॅसच्या व्यापक वापराचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. याला सरकारचा मोठा पाठिंबा आहे.अपारंपरिक ऊर्जा स्रोत हा विषय ग्रामपंचायती सहज हाताळू शकतात.ध्येय-8 प्रगती बद्दल आहे. ग्रामपंचायती यामध्ये फार थोडेयोगदान देऊ शकतात, तरीही ग्रामपंचायत स्तरावर चांगली कामे, रोजगार निर्मिती आणि सूक्ष्म उपक्रमांना प्रोत्साहन देणे इत्यादी गोष्टी हाती घेतल्या जाऊ शकतात. आपण यासाठी स्थानिक उपक्रमांद्वारे MGNREGS आणि नाबार्ड, KVIC, SIDBI इत्यादींचे कार्यक्रम आणू शकतो.MGNREGS मधील तरुणांना DDU-GKY मार्फतप्रगती कडे वळवले पाहिजे. येथे समाजातील विविध घटकांसाठी भरपूर काम निर्माण होऊ शकते.

**ध्येय-10** असमानता कमी करणे. भारतासारख्या देशात विषमता ही गरीबीपेक्षा भयंकर समस्या आहे. मॅक्रो पॉलिसींद्वारे विषमता कमी करतायेऊ शकते परंतु बहिष्कृतांना दिलासा देण्यासाठी, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांना विकास प्रक्रियेत आणण्यासाठीचे उपाय ग्रामपंचायती सहजपणे करू शकतात.

**ध्येय-12** शाश्वत उपभोग आणि उत्पादनासंबंधित आहे. हा वागण्यातील बदल आहे जो ग्रामपंचायती लोकांशी जोडलेले राहून आणि त्यांच्यासोबत काम करून साध्य करू शकतात. हरित विकास चळवळीच्या मदतीने पंचायती शाश्वत उत्पादन पद्धतींना प्रोत्साहन देऊ शकतात.

**ध्येय-16** शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजाविषयी आहे. शांततेची सुरुवातग्रामसभेत होते, ज्या प्रकारे तुम्ही - गरीब पुरुष/स्त्रीसह प्रत्येकाला समाविष्ट करता.लाखो उपाशी आणि कष्टकरी लोकांबद्दल गांधीजी म्हणाले- त्या सर्वांना ग्रामसभेत आणण्याची गरज आहे ती म्हणजे शांतता आणि समावेश.शेवटचे ध्येय (ध्येय 17) अंमलबजावणी मजबूत करणे आहे. SDGs च्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायती सक्षम आणि बळकट करणे गरजेचे आहे.ग्रामपंचायत स्तरावर आपल्या कामाला गती देण्याची गरज आहे. तरुण व्यावसायिकांनी समुदायांसोबत काम करणे आणि पंचायतींना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याचा सहभाग असलाच पाहिजे.चला पंचायती राज संस्थात्मक रचनेवर भर देऊ या. SDGसाठी स्वतंत्र नियोजन प्रणाली तयार करू नका. स्थानिक पातळीवर काम करून साठी जागतिक प्रभाव निर्माण करण्या साठी पंचायत ही उत्तम सुरुवात आहे.

आता गरिबीमुक्त पंचायतींचे नियोजन भारत सरकारला करायचे आहे. त्यासाठी सर्व उपक्रम एकत्र आणूया.पीपल्स प्लॅन कॅम्पेनद्वारे निर्माण झालेल्या गतीचा वापर करून श्रमिक बजेटचे नियोजन, SDG चे नियोजन आणि गरिबीमुक्त पंचायतींसाठी नियोजन,ग्रामपंचायत विकास योजना (GPDP) साठी करूया.पुढे सरकू या. संकल्पना समजून घेण्याला प्राधान्य दिले पाहिजे.SDG ची पद्धतशीर आखणी करून तीआमलात कशी आणायची, ते आम्ही या लेखात सांगितले आहे.एकदा तुम्हाला समस्या समजली की तुम्ही ती अधिक चांगल्या प्रकारे अभ्यासू शकता आणि गोष्टी आपोआप सुरळीत होतील.यासाठी, आपल्याला NIRD आणि PR, SIRD आणि PRs, राज्य सरकार, जिल्हा प्रशासन आणि काही पंचायत स्तरावरील 'सराव शाळा' आणि 'बीकन लीडर्स' यासारख्या प्रशिक्षण संस्थांचा पुरेपूर वापर करण्याची आवश्यकता आहे. हे वातावरण स्थानिक पातळीवरील कारवाईसाठी अनुकूल आहे. चला, लोकयोजनांचा या मोहिमांद्वारे प्रारंभ करूया आणि पुढे त्याची तीव्रता वाढवतनेऊया.

****

# भारतापासून तेतिच्यागावांपर्यंत स्थानिकस्वराज्यसंस्थांसोबत SDG चेस्थानिकीकरण

जयश्री रघुनंदन

संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे "आम्ही लोक" हे प्रसिद्ध उद्घाटनपर शब्द आहेत. हेच "आम्ही लोक" आज 2030 च्या वाटेवर चालत आहोत."

आमचे जग बदलत आहे: शाश्वत विकासासाठी 2030 अजेंडा – सप्टेंबर 2015, A/RES/70/1 मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेत स्वीकारला गेला.
"आम्ही, भारताचे नागरिक, स्वतःला समर्पित करतो", हे भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेतील निर्णायक शब्द आहेत.
शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) ही सार्वत्रिक उद्दिष्टे आणि लक्ष्य आहेत. ते एकात्मिक आणि अविभाज्य असून शाश्वत विकासाच्या - आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय या तीन आयामांमध्ये समतोल राखतात.17 SDGs चा 169 जागतिक लक्ष्यांसहित प्रवास सप्टेंबर 2015 मध्ये 193 देशांनी वचनबद्ध केला आणि तो 1 जानेवारी 2016 पासून लागू झाला.
2015-2016 हे वर्ष भारतातील ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) कार्यक्रमाद्वारे विकास नियोजनाची प्रक्रिया सुरू करण्याचे वर्ष देखील होते.तसेच चौदाव्या वित्त आयोगाअंतर्गत (2015-2020) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना 200,292.20 कोटीरु. निधी वाटपाचे हे ऐतिहासिक वर्ष होते.

## SDG भारत निर्देशांक

पहिला SDG इंडिया इंडेक्स (SDGII) बेसलाइन रिपोर्ट NITI आयोगाने 2018 मध्ये आणला होता. ज्यात राष्ट्रीय निर्देशक फ्रेमवर्क (NIF) च्या 306 निर्देशकांपैकी 62 प्राधान्य निर्देशकांचा संच होता, ज्यामध्ये राष्ट्रीय प्राधान्यक्रमांवर आधारीत 39 जागतिक लक्ष्यांचा आणि 13 उद्दिष्टांचा समावेश होता.भारतासाठी हा स्कोअर 57 इतका संमिश्रहोता. राज्यांच्या गुणांची श्रेणी (केंद्रशासित प्रदेशांसह) 42 ते 69इतकी होती.केरळ आणि हिमाचल प्रदेश 68 वर होते. चंदीगड 69 वर होते. उत्तर प्रदेश (42), बिहार (48) आणि आसाम (49) चा स्कोअर सर्वातकमी होता.
2019 च्याSDGII 2.0 मध्ये NIF तर्फे 100 निर्देशकांसोबत 16 उद्दिष्टे, 54 राष्ट्रीय लक्ष्ये समाविष्ट केलीआहेत.राज्यांचे स्थान, स्कोअर आणि SDG-निहाय, लक्ष्य आणि सूचक-निहाय स्थिती तयार केली गेली.मार्च 2021 मधील शेवटच्याSDGII 3.0 मध्ये, 16 गोल, 70 लक्ष्ये आणि 115 राष्ट्रीय निर्देशकांचा समावेश आहे. जो असे दर्शवितो, की भारतासाठी हा संमिश्र स्कोअर 66 वर गेला आहे.स्कोअर श्रेणी 52 ते 75 आहे.केरळ 75 सहित वरच्या स्थानावरअसून, तामिळनाडू आणि हिमाचल प्रदेश 74 वर आहेत.2018 पासून, मिझोराम जलद गतीने 68 आणि उत्तराखंड 72 (दोन्ही +12), ओडिशा (+10) 61 वर पोहोचले आहेत.
उत्तर प्रदेश आता सर्वात कमी स्कोअरवरून 60 वर गेला आहे आणि आसाम 57 वर आहे, तर बिहार 52 सह सर्वात शेवटच्या स्थानावर आहे.लक्ष्याचीवाढ आणि निर्देशकांमध्ये बदल यासाठीचा हा युक्तिवाद म्हणजे सफरचंद आणि संत्र्यांची तुलना करण्यासारखे आहे. या संदर्भातील सर्व राज्ये सफरचंद आणि संत्र्यांच्या एकाच टोपलीतून निर्देशकांच्या दृष्टिने कार्य करत आहेत ही स्थिती पहाता, महत्त्वाची प्रासंगिकता आणि राज्यांना उद्दिष्टे, लक्ष्ये आणि निर्देशकांच्या विरुद्ध प्रगती करण्यासाठीचे आवाहन अशी तीव्र स्थिती आहे.

SDGs, उद्दिष्टे आणि त्यातील निर्देशकांचे वास्तविक आकडे यांचे महत्त्वहे कृतीकडे लक्ष वेधण्यासाठी अधिक आहे.हे आकडे SDG 7 (परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा) (+22), SDG 11 (शाश्वत शहरे आणि समुदाय) (+26), SDG 12 (जबाबदार उपभोग आणि उत्पादन) (+19) मध्ये प्रचंड चढ-उतार दर्शवतात, तर SDG 6 (पाणी आणि स्वच्छता (-5), SDG 13 (हवामान कृती) (-6), SDG 9 (उद्योग, नवकल्पना आणि पायाभूत सुविधा) (-10)मध्ये उतारदर्शवतात.राज्यनिहाय आणि सूचकनिहाय उपलब्ध तपशील स्पष्टपणे दर्शवितात, की उद्दिष्टे आणि निर्देशकांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे आणि राज्यांनी ते आहे त्या स्थितीत का आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

## राज्य आणि जिल्हा

NIF कडून, राज्य निर्देशक फ्रेमवर्क पाहण्याचीसुद्धा गरज आहे, जी केवळ NIF च नाही तर विशिष्ट राज्यांसाठीसुद्धासमर्पकफ्रेमवर्क दर्शवते. निर्देशकांची निवड आणि त्याचे वजन वार्षिक प्रगतीचीदेखरेख करेल. यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे उप-राज्य स्तराकडे जाणे. मोजता येण्याजोग्या विशिष्ट निर्देशकांवरील आंतर-जिल्हा असमानता राज्य प्रायोजित योजना आणि विविध केंद्र प्रायोजित योजने अंतर्गत राज्याद्वारे केंद्रित गुंतवणूक सक्षम करते.अनेक राज्यांनी त्यांचे स्वतःचे जिल्हा सूचक फ्रेमवर्क (DIF) तयार केले आहे. नीती आयोगाच्या 113 मागास जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या आकांक्षी जिल्हा कार्यक्रम (ADP) द्वारे, डीआयएफचा वापर किती प्रभावीपणे केला जाऊ शकतो हे मोजले जाऊ शकते.2 वर्षांत 49 निर्देशकांमधील सुधारणा श्रेणी ही 50% पर्यंत आहे. ओडिशातील रायगडासारखे दुर्गम आणि खडतर जिल्हे सप्टेंबर 2018 मध्ये 112 व्या स्थानावर होते आणि ऑक्टोबर 2020 मध्ये ते 5 व्या स्थानावर गेले; नोव्हेंबर 2018 मध्ये यूपी मधील फतेहपूर 105 व्या स्थानावरून, मे 2019 (डेल्टा रँकिंग) मध्ये 2 या स्थानावर गेले.निःसंशयपणे, या आणि इतर जिल्ह्यांमध्ये अशा वेगाने झालेल्या सुधारणांचे श्रेय कार्यक्रमामागील तत्त्वज्ञान, मोजता

माजी अतिरिक्त मुख्य सचिव, तामिळनाडू सरकार.

येण्याजोगे निर्देशक, तुलना आणि एकाग्रतेने लक्ष केंद्रित करून केलेली कृती यांना दिले जाते.ADP आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, जलस्रोत, आर्थिक समावेशन, कौशल्य विकास आणि मूलभूत पायाभूत सुविधा याकडे लक्ष पुरवते. ही सगळी क्षेत्रे शाश्वत विकास उद्दिष्टांच्या कक्षे अंतर्गत येतात.

## उप-जिल्हा

SDGs च्या आधारे राज्यांना त्यांच्या कामगिरीचा आरसा दाखवण्याचे काम SDGII करू शकते.राज्य सरकारला तपासणी करून त्यावर कारवाई करण्यासाठी आंतर-जिल्हा असमानतेच्या तपशीलांचे पुरावे DIFसादर करू शकते. राष्ट्रीयस्तरापासून ते राज्यापर्यंत, 2सरकारीपातळ्याSDGs साध्य करण्याच्या प्रक्रियेत समाविष्ट आहेत. कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख यामध्ये भारत सरकार आणि राज्य सरकार थेट सहभागी आहेत.ग्रामीण भागात, केंद्र प्रायोजित योजना आणि राज्य प्रायोजित योजना कार्यक्रम सरकारी अधिकार्यांच्या मार्फत राबविण्यात येतात, जिल्हे ह्या जबाबदारीच्याअंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण स्तर आहेत. असे असले तरीही, ब्लॉक आणि ग्रामपंचायतींमध्ये, जे निःसंशयपणे विकासाचे अनेक स्तर आणि अनेक ठिकाणी लक्ष वेधणारे मुद्दे आणि विकेंद्रित ध्येयाची आणि दृष्टिकोनाची गरज दर्शवितात, त्यासाठी उपजिल्हा स्तरावर अधिक खोलात जाणे आवश्यक आहे. ही कुठली नवीनव्याख्या, तत्वज्ञानकिंवा कृतीनाही.

यासाठी राज्याच्या पाठिंब्याचे एक उत्कृष्ट उदाहरण दुर्दैवाने असे की, राज्य सरकार (आणि जिल्हा प्रशासन) मार्फत खेडे आणि वाड्यावस्त्यांच्या पिण्याच्या, स्वच्छ पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यापेक्षा जेजेएम अंतर्गत 55 एलपीसीडी प्रदान करण्यात अव्वल स्थान मिळविण्याच्या शर्यतीकडे जास्त लक्ष दिले जात आहे असे दिसते. आणि या मिशन अंतर्गत निधीसाठीजलस्रोत,हा सर्वात गंभीर मुद्दा कुठेच येत नाही.

याही पुढे जाऊन, ग्रामपंचायती पिण्याच्या पाण्याच्या आणि घरगुती गरजांच्या पलीकडे गावाच्या पाण्याच्या गरजा, शेतीच्या गरजा, भूजल पातळी, पाणी साठवण इत्यादींचे मूल्यांकन आणि विविध विभागांकडून उपलब्ध अनेक योजनांचा वापर या सर्वांगीण दृष्टीकोनातून प्रगती साध्य करतात, त्या उद्दिष्टासाठी नियोजन करण्याऐवजी , अधिकार्यांकद्वारे विविध योजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या भिन्न भौतिक लक्ष्यांवर उपलब्धी म्हणून प्राधान्य देण्यात येत आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत SDG चे स्थानिकीकरण

प्रत्येक पंचायत आणि त्यातील सर्वलोकांसाठी या जागतिक उद्दिष्टांचे स्थानिकीकरण केल्याशिवाय, ही उद्दिष्टे साध्य करणे अशक्य आहे.कुठे काय करायचे हे अधिकार्यांनी फार पूर्वी ठरवले आहे आणि आता आपल्याला सर्व क्षेत्रांमध्ये असमानता दिसत आहे.
यापुढील आवश्यक पायरी असेलस्थानिक इंडिकेटर फ्रेमवर्क, जे ग्रामपंचायत स्तरावर स्थानिक पातळी संबंधित लक्ष्ये साध्य करण्यासाठी, ब्लॉक, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील लक्ष्य आणि निर्देशकांमध्ये केलेल्या कामगिरी एकत्रित करतात आणि त्यांचा समन्वय साधतात.हे इंडिकेटर एसडीजीच्या संपूर्ण पटावर विविध पंचायती कोठे आहेत याचे चित्र सादर करेल आणि त्याआधारे नियोजन आणि हस्तक्षेपांसाठी पुरावा तयारहोईल.

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), जल जीवन मिशन (JJM), स्वच्छ भारत मिशन (SBM), पोषण अभियान इत्यादी सारख्या भारत सरकारच्या अनेक प्रमुख योजना आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असे नमूद करतात की गावपातळीवर योजना असणे आवश्यक आहे, ग्रामसभांचा सहभाग, माहीतीची देवाणघेवाण, पंचायत राज संस्थांच्या (पीआरआय) निवडलेल्या प्रतिनिधींना प्रशिक्षण, या प्रक्रियेत स्थानिक स्वराज्य संस्थांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जातो, पण वास्तुस्थिती अगदी वेगळी आहे.राज्य सरकारआणि त्यांनी अनुसरण केलेली प्रक्रिया यावर अधिकाराचे हस्तांतरण, आणि पंचायतींचा किती प्रमाणात सहभाग असावा हे सोडले जाते.राज्यांनी ग्रामीण भागात राबविलेल्या विविध मंत्रालयांच्या अनेक योजनांमुळे, तसेच राज्य विशिष्ट योजनांमुळे SDGs मध्ये प्रगती झाली आहे यात काहीच शंका नाही.

योजनेच्या भौतिक आणि आर्थिक कामगिरीचे निरीक्षण केले जाते. यापैकी वाजवी संख्या NIF मधीलपाणी, पोषण, आरोग्य, शिक्षण इ. तथापि, भूगर्भातील पाण्याची उपलब्धता, पोषण स्थिती सुधारणे, स्त्रिया आणि मुलांवरील गुन्हे रोखणे आणि सहाय्य सेवा यासारख्या समस्यांचे निराकरण करणे यासारख्या निर्देशकांशी जुळते. मागासलेल्यांसाठी विशिष्ट दृष्टीकोन निश्चित करणे आणि कोणालाही मागे न ठेवण्याचे (LNOB) लक्ष्य साध्य करण्यासाठी पाठपुरावा करणे आणि एकही गाव मागे न ठेवणे, यासाठी SDGs चे गाव (वस्ती) स्तरापर्यंत स्थानिकीकरण करणे आवश्यक आहे

योजनेच्या भौतिक आणि आर्थिक कामगिरीचे निरीक्षण केले जाते. यापैकी वाजवी संख्या NIF मधीलपाणी, पोषण, आरोग्य, शिक्षण इ. तथापि, भूगर्भातील पाण्याची उपलब्धता, पोषण स्थिती सुधारणे, स्त्रिया आणि मुलांवरील गुन्हे रोखणे आणि सहाय्य सेवा यासारख्या समस्यांचे निराकरण करणे यासारख्या निर्देशकांशी जुळते. मागासलेल्यांसाठी विशिष्ट दृष्टीकोन निश्चित करणे आणि कोणालाही मागे न ठेवण्याचे (LNOB) लक्ष्य साध्य करण्यासाठी पाठपुरावा करणे आणि एकही गाव मागे न ठेवणे, यासाठी SDGs चे गाव (वस्ती) स्तरापर्यंत स्थानिकीकरण करणे आवश्यक आहे

## राज्य आणि केंद्र सरकारने त्यांना समान भागीदार म्हणून ओळखणे आवश्यक आहे.

शाश्वत विकासाचेध्येय साध्य करण्यासाठी 5Ps - लोक, भागीदारी, समृद्धी, ग्रह आणि शांतता उप-जिल्हा स्तरावर, ब्लॉकपर्यंत, प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचले पाहिजे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 3 पातळ्यांवर हे काम उत्तम प्रकारे केले जाते.

73 व्या घटनादुरुस्तीने राज्यघटनेत भाग IX जोडलागेला; घटनेचे कलम 243Gची खात्री करण्यासाठीतीनही स्तरावरील पंचायती राज संस्था स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करू शकतील.PRIs ची जबाबदारी म्हणून नोंद केलेले (हस्तांतरित केलेले) 29 विषय, जसे की पेयजल, आरोग्य आणि स्वच्छता, पाणी आणि पाणलोट व्यवस्थापन, दारिद्र्य निर्मूलन, महिला आणि बालकल्याण, सामाजिक आणि शेत वनीकरण इ.थेट SDG शी जोडलेले आहेत.
कोणालाही मागे न ठेवता, एकही गाव मागे न राहण्याचा मार्ग म्हणजे ग्रामपंचायतीकडे जाणे, त्यांना पूर्णतः सहभागी करून

घेणे, भारत सरकार आणि राज्य सरकार दोघांचेही एक प्रभावी मिशन बनवणे, हाभारतासाठी SDGs साध्य करण्याचा मार्गआहे. हे त्यांचे जीवन आहे आणि त्यांचा सक्रिय सहभाग आणि निर्णय क्षमताही असली पाहिजे.

कोविडमुळे सर्व जग मागे ढकलले गेले आहे आणि जगभरातील SDGs वर जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर आणि प्रगतीवर परिणाम झाला आहे.पुन्हा प्रवाहात सामिल होण्याच्या प्रक्रियेत, आपण जाणीवपूर्वक, नियोजनबद्ध आणि पद्धतशीरपणे ग्रामीण भागात SDGs चे स्थानिकीकरण करणे आवश्यक आहे, PRIs च्या सहभागासह, केंद्र आणि राज्य सरकारच्या स्तरावरून स्थानिक स्वराज्य संस्थाकडे वळणे; 2.56 लाख ग्रामपंचायती, 6,626 ब्लॉक पंचायती, 621 जिल्हा पंचायतींमध्ये 31 लाख निवडून आलेले प्रतिनिधी (14 लाखांहून अधिक महिला प्रतिनिधी) असलेल्या पंचायत राज संस्था ही भारतातील सर्व गावांमध्ये बदल घडवून आणणारी एक मोठी शक्ती आहे.भारतातून तिच्या गावांमध्ये जाण्यासाठी आणि भारतासाठी SDGs साध्य करण्यासाठी पंचायत राज संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समान भागीदारीसह ग्रामीण भागात SDG चे स्थानिकीकरण आवश्यक आहे.

"शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी आम्ही सर्व स्तरावरील सरकार आणि विधिमंडळाच्या मुख्य भूमिकेची पुष्टी करतो." - UN च्या जुलै 2012 च्या ठरावातील उतारा, 'द फ्युचर व्हॉन्ट', सप्टेंबर 2015 मध्ये UN आमसभेत मंजूर

(माहितीचा स्रोत: SDGII अहवाल, NITI आयोग)

****

# SDG चे स्थानिकीकरण स्थानिक विकासाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आहे: लोकल इंडिकेटर फ्रेमवर्क (LIF) आणि पंचायतीसाठी डॅशबोर्ड

सुकन्याकेयु [1]

2030 चा अजेंडा प्राप्त करण्यासाठी प्रादेशिक/स्थानिक संदर्भ विचारात घेणे, उद्दिष्टे आणि ध्येय ठरवण्यापासून, अंमलबजावणीची साधने निश्चित करणे आणि प्रगतीचे मोजमाप आणि निरीक्षण करण्यासाठी निर्देशकांचा वापर करणे, म्हणजे विकासाचे स्थानिकीकरण होय.

आपले उद्दिष्टSDGs साध्य करण्याच्या आव्हानांना सामोरे जाणे आणि SDGs, राज्यधोरण, राज्य विकास योजना आणि स्थानिक सरकारी विकास योजना यांच्यात अधिक सुसंगत आणि नियोजनपूर्वक अभिसरण करणे हे आहे (भारतातील केरळ राज्याने वार्षिक किंवा पंचवार्षिक विकास योजना आणि अर्थसंकल्पावरलक्ष केंद्रित करून एक मजबूत स्थानिक विकास प्रणाली विकसित केली आहे).

हा स्थानिक आणि उप-राष्ट्रीय सरकार, राष्ट्रीय सरकार, व्यवसाय, समुदाय-आधारित संस्था आणि इतर स्थानिक कलाकारांचा एक अभिसरण बिंदू आहे.स्थानिक नेत्यांना आणि समुदायांना परस्पर सहकार्याने चिंतन करत आणि सामायिक उपायाने, अडथळे दूर करण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर SDGs पुढे नेण्यासाठी उपयोगी ठरतील अशा धोरणांची अंमलबजावणी करण्यात,SDG चे स्थानिकीकरण मदत करते.

या पार्श्वभूमीवर, स्थानिक विकासाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी, स्थानिक सरकारी (पंचायत) स्तरावर विकासाच्या प्रक्रियेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी SDGs ची परिकल्पना करणारा सर्वसमावेशक दृष्टिकोन/रणनीती विकसित करणे आवश्यक आहे.

ध्येय निश्चिती, देखरेख आणि अंमलबजावणीमधील विद्यमान अनुभवाच्या आधारे SDG चे उद्दिष्टे साध्य केले जाऊ शकते आणि केले पाहिजे.2030 अजेंडाच्या अंमलबजावणीसाठी जबरदस्त पाठपुरावा आणि पुनरावलोकन यंत्रणेसाठी निर्देशक आणि सांख्यिकीय माहितीचे ठोस फ्रेमवर्क आवश्यक आहे. विषय, उद्दिष्टे आणि निर्देशकांवर आधारीत स्थानिक सरकारी स्तरावरील उद्दिष्टे महत्त्वाकांक्षी स्वरुपाची असतात, राष्ट्रीय धोरणे आणि प्राधान्यक्रमांच्या अनुषंगाने तसेच स्थानिक वास्तविकता थोडक्यात आणि सहज संवाद साधून, लक्षात घेऊन सर्वत्र लागू होणारी जागतिक उद्दिष्टे असतात.त्यानुसार SDG लोकल इंडिकेटर फ्रेमवर्क (LIF) आणि वेब पोर्टलवर आधारित SDG डॅशबोर्ड विकसित करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे, जे स्थानिक सरकार आणि समुदायांना स्थानिक पातळीवर SDG चे प्रशिक्षण, नियोजन आणि देखरेख करण्यासाठी मदत करते.योजना और निगरानी के लिए स्थानीय सरकार और समुदायों की मदद करता है।

स्थानिक सरकार धोरण तयार करते, बदलाचे उत्प्रेरक आहे आणि जागतिक उद्दिष्टे स्थानिक समुदायांशी जोडण्यासाठी सरकारीस्तर सर्वोत्तम आहे.विकासाचे स्थानिकीकरण ही सर्व स्थानिक भागधारकांना सक्षम बनविण्याची प्रक्रिया असून, शाश्वत विकास अधिक प्रतिसादात्मक बनवणे हा त्याचा उद्देश आहे आणि म्हणून ते स्थानिक गरजा आणि इच्छांशी संबंधित आहे.स्थानिक कलाकारांनी केवळ अंमलबजावणीतच नाही तर अजेंडा ठरवण्यात आणि देखरेखीतही पूर्ण सहभाग घेतला, तरच विकासाची उद्दिष्टे गाठली जाऊ शकतात.सहभागासाठी आवश्यक असणारी सार्वजनिक धोरणे वरून लादली न जाता संपूर्ण पॉलिसी साखळी सामायिक करणे गरजेचे आहे. या संबंधित सर्व कलाकारांचा स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरीलसल्लागार आणि सहभागी यंत्रणांद्वारे निर्णय प्रक्रियेत सहभाग असणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर, स्थानिक विकासाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सर्वसमावेशक दृष्टीकोन/रणनीती विकसित करणे आवश्यक आहे, जी पंचायत स्तरावरील विकासाच्या प्रक्रियेत परिवर्तनाची सुरुवात म्हणून SDGs चाविचार करेल.

**हे खालील प्रकारे आमलात आणता येईल:**

**अ-स्थानिक फ्रेमवर्क निर्देशक(LIF)**

**इंडिकेटर फ्रेमवर्क प्रस्तावना:**

निर्देशक हे स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीयआणि जागतिक स्तरावर SDG च्या प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी मुख्य आधार असतील.एक चांगले फ्रेमवर्क SDGs आणि त्यांचे लक्ष्य केवळ देश आणि जागतिक समुदायालाच नव्हे तर उपराष्ट्रीय आणि स्थानिक स्तरांवर अंमलबजावणी धोरणे विकसित करण्यात आणि त्यानुसार संसाधनांचे वाटप करण्यात मदत करण्यासाठी व्यवस्थापन साधनात बदल घडवेल.शाश्वत विकासाच्या दिशेने प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी आणि SDGs साध्य करण्यासाठी, सर्व भागधारकांची जबाबदारी निश्चित करण्यात मदत

संशोधन सहाय्यक, केरळ स्थानिक प्रशासन संस्था (KILA) आणि स्थानिक सरकारांसाठी SDGs च्या KILA केंद्राचे समन्वयक

करण्यासाठी ते रिपोर्ट कार्ड म्हणून देखील काम करतील.

शाश्वत विकास उद्दिष्टे कृती-केंद्रित, संक्षिप्त आणि संवाद साधण्यास सुलभ, महत्वाकांक्षी, जागतिक स्वरूपाची आणि सर्व देशांना सर्वत्र लागू होणारी असली पाहिजेत, हे अधोरेखित करतानाआम्ही राष्ट्रीय वास्तविकता, क्षमता आणि विकासाचे स्तर लक्षात घेऊन राष्ट्रीय धोरणे आणि प्राधान्यांचा देखील आदर करतो.शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उद्दिष्टे ही संबोधित केली पाहिजेत आणि प्राधान्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, याची देखील आम्हाला जाणिव आहे.

SDG ची उद्दिष्टे साध्य करणे हे ध्येय निश्चिती, देखरेख आणि अंमलबजावणीमधील विद्यमान अनुभवाच्या आधारे तयार केले जाऊ शकते आणि केले पाहिजे. विषय, लक्ष्य आणि संकेतकांद्वारे घेतलेली एलएसजी स्तरावरील उद्दिष्टे महत्त्वाकांक्षी स्वरूपाची असतात, ती राष्ट्रीय धोरणे आणि प्राधान्यक्रमांनुसार स्थानिक वास्तविकता लक्षात घेऊन संक्षिप्त पद्धतीची आणि संवाद साधण्यास सुलभ असतात.

SDGs च्या स्थानिकीकरणामध्ये LSG ची खात्री होईपर्यंत जागतिक निर्देशक आणि राष्ट्रीय निर्देशकांना तळागाळापर्यंत जोडणारी ही पुनरावृत्तीची प्रक्रिया आहे.SDGs ची बहुतेक उद्दिष्टे आणि निर्देशक स्थानिक स्तरावर साध्य करायचे आहेत. बहुतेक SDGs हे LSG ला देण्यात आलेल्या विषयांशी संबंधित आहेत.

विकसित केलेले हे स्थानिक निर्देशक फ्रेमवर्क सर्व SDGs विचारात घेते. असे असले तरी, ते स्थानिक पातळीवरील कृतींसाठी थेट संबंधित SDGs वर लक्ष केंद्रित करते.अशाप्रकारे उपक्रमाचे मुख्य लक्ष 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 12, 13, 14, 15, 16 आणि 17 याSDGsवर केंद्रित आहे.निर्देशक आणि लक्ष्यांचे स्थानिक रुपांतर करण्यासाठी आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ही विकसित केलेली साधने मदत करतात.या वस्तुस्थितीचा आधार हा आहे की देशाने स्थानिक सरकारी संस्थांची एक प्रणाली तयार केली आहे आणि केरळ राज्याने त्यांना कार्ये, कार्यकर्ते आणि निधीचे हस्तांतरण करून सक्षम केले आहे.वर नमूद केलेल्या SDGs ला लागू असलेल्या विविध विषयांवरील सहभागी क्षेत्रांना समाविष्ट करणारी स्थानिक नियोजन आणि अर्थसंकल्पासह हे राज्य पुढे गेले.स्थानिक सरकारांना उद्दिष्टे, निर्देशक आणि लक्ष्य निश्चित करण्यासाठी उपक्रमाचा एक भाग म्हणून विकसित केलेली स्थानिक सूचक चौकट, जागतिक आणि राष्ट्रीय निर्देशकांना स्थानिक विकासाच्या वास्तविकतेशी जुळवून घेण्यास वाव देते.अशा प्रकारे SDGs सह नियोजन आणि अर्थसंकल्प अधोरेखित परिणाम देणारे ठरतात. वेब-पोर्टल आधारित डॅशबोर्ड हे एक परस्परसंवादी साधन आहे जे नियोजन आणि देखरेख करण्यात मदत करते.हे समुदायांना स्थानिक SDG स्थितीबद्दल जागरूक राहण्यास मदत करते ज्यामुळे विकास प्रक्रिया पारदर्शक आणि उत्तरदायी बनते.

लाइन विभागांचे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडून आलेले अधिकारी आणि नागरिक हे प्रमुख भागधारक आहेत. हा उपक्रम एक नियोजन आणि देखरेख फ्रेमवर्क प्रदान करतो, ज्यामध्ये सहभागींना राज्यस्तरीय माहिती अभ्यासावी लागते, तिची जिल्हा स्तरावरील माहितीशी तुलना करावी लागते आणि विकासात तफावत असल्यास ओळखणे आवश्यक असते.

आढळूनआलेल्या विकासाच्या तफावतीच्या आधारे, स्थानिक पातळीवर धोरणे तयार केली जाऊ शकतात. हे सहभागींना विविध योजनांचीआखणी करण्यास आणि अभिसरण शक्यतांचे अन्वेषण करण्यास सक्षम करते.वेब आधारित डॅशबोर्डमध्ये समाविष्ट केलेले मॉनिटरिंग फ्रेमवर्क सहभागींना वेगवेगळ्या दृष्टिकोनातून SDGs प्राप्त करण्याच्या प्रगतीचे नियोजन आणि निरीक्षण करण्यास मदत करते.केरळ इन्स्टिट्यूट ऑफ लोकल ॲडमिनिस्ट्रेशन (KILA) या भागधारकांना SDG चे नियोजन, त्यांचे स्थानिकीकरण आणि विकसित साधनांचा वापर करण्याचे प्रशिक्षण देते. हे प्रशिक्षण प्रत्येक भागधारक गटासाठी बॅचमध्ये, आणि कॅस्केडिंग पद्धतीने दिले जाते.याशिवाय, स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणामध्येही स्थानिक सहभागात्मक विकास नियोजनासाठी या विषयाचा समावेश करण्यात आला आहे.या वर्षीपासून, केरळ सरकारने जारी केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे स्थानिक नियोजनाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये SDG आधारित नियोजनाचा समावेश करण्यात आला आहे.

निर्देशक आणि लक्ष्ये यांनी SDGs चे स्थानिकीकरण करताना, LIF ने प्रदान केलेल्या स्थानिक स्तराशी जुळवून घेणे आवश्यक आहे. निर्णय घेणाऱ्यांना ध्येयठरवण्यासाठी, कामाची आखणी करण्यासाठी आणि निरीक्षण करण्यासाठी माहिती आणि डेटा आवश्यक असतो.अचूक माहिती आणि नियोजन आणि संसाधनांचे वाटप सुधारण्यास मदत करते. या क्रिया परिणामाभिमुख असाव्या लागतात आणि LIF ही संधी प्रदान करते.डेटा डॅशबोर्ड नियोजन, देखरेख, मापन, विश्लेषण आणि विविध डेटासेटमधून संबंधित माहिती काढण्याचे परस्परसंवादी माध्यम प्रदान करतो.ऐतिहासिक नमुने, सहसंबंध आणि ट्रेंडसाठी ऑनलाइन डेटा व्हिज्युअलायझेशन उपयुक्त आहे जे ऑनलाइन वातावरणात कृती करण्यायोग्य माहिती मिळवण्यासाठी मदत करतात.

## 2. पंचायतीसाठी डॅशबोर्ड

"सरकार आणि इतर भागधारकांना शाश्वत विकास उद्दिष्टां (SDGs) ची प्रगती मोजण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी आणि माहिती या दोन्हीमधील अंतर हायलाइट करण्यासाठीचे एक साधन हा डॅशबोर्डचा हेतू आहे.अंमलबजावणीसाठी SDGs मार्फत प्राधान्यक्रम ओळखण्यासाठीपरस्परसंवादी डॅशबोर्ड देशांच्या कामगिरीचे दृश्य प्रतिनिधित्व करतात."

पंचायत स्तरावर, माहितीची क्रांती समुहाला, विशेषतः त्यांच्या संदर्भासाठी अर्थपूर्ण असणारे लक्ष्य आणि निर्देशक ओळखण्यास आणि तयार करण्यास सक्षम करते.समुहाने त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी केलेल्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी हे व्यासपीठ प्रदान करते.महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येकाने विकासाच्या बाबतीत आवाज उठवला पाहिजे, हे निश्चित करते.प्रत्येकाकडे पंचायतीच्या माहितीचे परीक्षण करण्याची तसेच नागरिकांचा डेटा तयार करण्याची क्षमता आहे ज्याचा उपयोग वास्तविकतेच्या आधारावर त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी केला जाऊ शकतो.
KILA ने स्थानिक स्वराज्य संस्थे (LSGs) साठी SDGs साठी प्रशिक्षण टूलकिट विकसित केले आहे.प्रशिक्षण टूलकिट हा स्थानिक स्तरापासून राज्य स्तरापर्यंत शोधता येण्याजोगा डेटाबेस आहे; जो सर्व भागधारकांना त्यांच्या संबंधित क्षेत्रात

त्यांचा स्वतःचा डेटा तयार करण्यास मदत करतोआणि डेटाची गुणवत्ता, विश्वासार्हता, उपलब्धता आणि तुलनात्मकता सुधारण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देतो. पर्यायाने हे स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रत्येक निर्देशकाच्या संदर्भात त्यांच्या स्थितीचे पुनरावलोकन, विश्लेषण आणि सुधारणा करण्यास मदत करते आणि प्रत्येक क्षेत्रातील खाचाखोचा ओळखण्यासाठी आणि समाजाच्या सुधारणेसाठी आणि परिवर्तनासाठी,SDGs साध्य करण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी, आणित्यानुसार SDGs, राज्य धोरणे, राज्य पंचवार्षिक योजना आणि स्थानिक स्वराज्य विकास योजना यांच्यात अधिक सुसंगत योजना तयार करूनत्यांचे अभिसरण करण्यास मदत करते.

**SDGs साठी डेटा क्रांतीच्या दिशेने: निर्देशकांची भूमिका:**

SDGs साठी डेटा क्रांतीच्या दिशेने: निर्देशकांची भूमिका:
निर्देशक हे स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीयआणि जागतिक स्तरावर SDG च्या प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी मुख्य आधार असतील.एक चांगले फ्रेमवर्क SDGs आणि त्यांचे लक्ष्य केवळ देश आणि जागतिक समुदायालाच नव्हे तर उपराष्ट्रीय आणि स्थानिक स्तरांवर अंमलबजावणी धोरणे विकसित करण्यात आणि त्यानुसार संसाधनांचे वाटप करण्यात मदत करण्यासाठी व्यवस्थापन साधनात बदल घडवेल.शाश्वत विकासाच्या दिशेने प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी आणि SDGs साध्य करण्यासाठी, सर्व भागधारकांची जबाबदारी निश्चित करण्यात मदत करण्यासाठी ते रिपोर्ट कार्ड म्हणून देखील काम करतील.SDGs च्या मॉनिटरिंग इंडिकेटर फ्रेमवर्कसाठी LSG स्तर डॅशबोर्ड विकसित करून हे कार्यान्वित केले जाऊ शकते.

**पंचायतीसाठी डॅशबोर्ड**

SDGs च्यास्थानिकीकरणाचा निर्णय घेणार्यांसाठी एक देखरेख यंत्रणा म्हणून, धोरण निर्माते आणि सेवा प्रदात्यांना त्यांच्या सेवांची गुणवत्ता सुधारण्यासाठी अचूक आणि वेळेवर माहिती आणि डेटा मिळणे आवश्यक आहे.अचूक आणि वेळेवर माहिती आणि संसाधनांचीउपलब्धी, नियोजन आणि संसाधनांचे वाटप यासह विद्यमान समस्यांवर योग्य प्रतिक्रिया देण्यास मदत करते आणि भविष्यात प्रतिबंधात्मक कृतींसाठी योजना तयार करण्यास सक्षम करते.


• राज्य, जिल्हा आणि स्थानिक कार्यकर्ते या डॅशबोर्डद्वारे लक्ष्याचा विकास करू शकतात, SDGs प्राप्तीच्या प्रगतीचा पाठपुरावाकरून त्यांचे निरीक्षण करू शकतात.

• भविष्यात सामान्य लोकही या प्लॅटफॉर्मचावापर करू शकतात आणि स्वयं-मूल्यांकन आणि खालील गोष्टींची समज सुधारण्याच्या हेतूने प्रयत्नकरू शकतात:
 oस्थानिक ते राज्य पातळीवर डेटाचे संकलन, विश्लेषण आणि वितरण.
 oस्थानिक पातळीवर पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, कृषी, रोजगार, उद्योग आणि ऊर्जा इत्यादींसह विविध विषयांवर डेटाचे नाविन्यपूर्ण स्रोत ओळखण्यात मदत करते.
 oस्थानिक आणि राज्य स्तरावर SDG च्याप्रगतीचे निरीक्षण करणे.




• डेटा डॅशबोर्ड असे साधन आहे जे परस्परसंवादी, तात्कालिक आणि दृश्य पद्धतीने माहिती प्रदर्शित करताना मुख्य क्षेत्रातील विविध डेटासेटमधून निरीक्षण, मोजमाप, विश्लेषण आणि संबंधित माहिती काढण्यासाठी केंद्रीकृत, परस्परसंवादी माध्यम प्रदान करते.
•ऑनलाइन डेटा व्हिज्युअलायझेशन हीसंज्ञा डेटासेट काढण्याच्या प्रक्रियेचे वर्णन करण्यासाठी आणि ऐतिहासिक नमुने, सहसंबंध आणि ट्रेंड उघड करताना त्यांना व्हिज्युअल, ग्राफिक पद्धतीने सादर करण्यासाठी आहे, जी वापरकर्त्यांना ऑनलाइन वातावरणात कृती करण्यायोग्य स्थिती निर्माण करण्यात मदत करते.

**डॅशबोर्ड- फ्रंट एंड**
हा डॅशबोर्डचा पुढीलभाग आहे. ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे
• ध्येयांप्रमाणे विविध SDG निर्देशकांसाठी जलद शोध.
• क्लाउड-आधारित ओपन-सोर्स SDG रिपोर्टिंग आणि मॉनिटरिंग सोल्यूशन.
• लक्ष्य
• निर्देशक
• कामगिरीचे ध्येयनिहाय विश्लेषण.
• SDG निर्देशक कामगिरी विषयवार पहाणे.
• LSG आणि त्याच्या कार्यप्रदर्शनाचा डेटा पाहण्यासाठी उद्दिष्टे, लक्ष्ये आणि निर्देशक विस्तृत आणि संकुचित करणे.
• लक्ष्य आणि निर्देशकांसह प्रत्येक ध्येयाचे ग्राफिकल सादरीकरण.
• निवडक इंडिकेटर आणि त्याचे स्ट्रॅटिफायर विविध चार्टमधील कालखंडानुसार पाहण्यासाठी सानुकूलचार्ट.
• ॲनिमेटेड चार्टमध्ये बहु-आयामी डेटा एका कालावधीत सानुकूलित करा आणि पहा.
• LSG ची निर्देशकांनुसार रँकिंग/स्थिती सानुकूलित करा आणि पहा.
• LSG साठी SDG निरीक्षण अहवाल तयार करा.
• चार्ट डाउनलोड करा आणि ते सोशल मीडियावर सामायिक करा.
• नोंदणी करा आणि डॅशबोर्डवर तुमचा डेटा पहा.
• संपर्ककरा




• SDG इंटरएक्टिव्ह डेटा डॅशबोर्ड प्रादेशिक, राष्ट्रीय, उप-राष्ट्रीय आणि पंचायत स्तरावर किंवा विशिष्ट शाश्वत विकास लक्ष्यासाठी देखील सानुकूलित केला जाऊ शकतो.


**डॅशबोर्डवर SDGsचे नियोजन आणि देखरेख - विस्तारित दृष्टिकोन**

M&E प्लॅटफॉर्म SDGs,पंचायत विकास योजना आणि अशा इतर परिणामकारक फ्रेमवर्कचा मागोवा, निरीक्षण आणि अहवाल सादर करण्यात मदत करण्यासाठी विकसित केला आहे.हा संवाद आणि समन्वयातील अंतर सुधारणारा, वापरकर्ता-अनुकूल आणि वेब-आधारित डिजिटल प्लॅटफॉर्म आहे.तो अत्याधुनिक दळणवळण पध्दतींचा वापर करून SDGs आणि राष्ट्रीय निकालांच्या बातमीसह पंचायत विकास योजनांची कार्यक्षमता,परिणामकारकता आणि अंमलबजावणी सुधारेल आणि प्रगत संवादमाध्यमे, वाढीव पारदर्शकता आणि मोकळेपणा स्थापित करून देखरेख आणि मूल्यमापनाच्या टप्प्यावर लक्षणीय परिणाम करेल. प्लॅटफॉर्म प्रत्येकाला वन-स्टॉप शॉप म्हणून गुंतवून ठेवतो. जिथे लोक नवीन माहिती आणि विषय शोधू शकतात.

राष्ट्रीय आणि राज्य मूल्यांसोबत वर्षवार लक्ष्यनिहाय विश्लेषण विस्तारित दृश्यात दर्शविले आहे. आणि प्रत्येक जीपी, बीपी, डीपी पातळीच्या संदर्भात आपण वर्षवार स्थिती पाहू शकतो.



राष्ट्रीय निर्देशकांसह ध्येय
राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील मूल्यांसह प्रत्येक ध्येयाच्या कामगिरीचास्तर आपण या पृष्ठावर पाहू शकतो.




**प्रमुख फायदे**

• ध्येय, लक्ष्य आणि निर्देशकानुसार तुमच्या राष्ट्रीय SDG ची कामगिरी पहा.
• डेटामधील त्रुटी ओळखा, LSG शी संबंधित SDG निर्देशकांची तुलना करा आणि विश्लेषण करा.
• SDG डेटाची उपलब्धता आणि त्रुटी, प्रादेशिक, राष्ट्रीय, उप-राष्ट्रीय आणि पंचायत SDG डेटा मॉनिटरिंग डॅशबोर्ड आणि अहवाल डिझाइन आणि विकसन करण्यासाठी मूल्यांकनास समर्थन द्या.
• जिथे GP म्हणजे राष्ट्रीय आणि राज्य सरासरीची तुलना आहे.
• GPDP मार्फत कामांची आखणी करा.
• आवश्यक असल्यास प्रत्येक LSG ला स्वतःहून नवीन निर्देशक जोडा.
• प्रत्येकासाठी स्वतःहून स्थानिक लक्ष्य सेट करा.
• वार्षिक अपडेट निरीक्षणास मदत करेल.
• हे सर्व पंचायत स्तरावर स्वतःहून केले जाऊ शकते.
• ग्रामसभांमध्ये प्रक्षेपित केले जाऊ शकते.
• SDGs च्या योजना आणि देखरेखीवर डॅशबोर्ड.

******

# शिक्षणा साठीशाश्वत विकास ध्येयाचे स्थानिकीकरण

जे पी पांडे,

शिक्षणाचा मानवाच्या प्रगतीतमोलाचावाटा आहे. हा सुधारीतजीवनासाठी देखी लए कमहत्त्वाचा घटक आहे. SDG4 सर्वसमावे शकआणि न्याय्यदर्जाच्या शिक्षणाची निश्चिती करण्या साठी आणि सर्वांना आजीवन शिक्षणाच्या संधी उपलब्ध असाव्यात, याची परिकल्पना करतो. SDG4 10 लक्ष्यां नीबनलेला आहे. सर्व महिला आणि पुरूषांना वाजवी दरात आणि दर्जे दारतांत्रिक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्ये, लैंगिक असमानता दूरकरणे, समानता, शांतता आणि अहिंसे च्यासंस्कृती चाप्रचार, जागतिक नागरिकत्व आणि सांस्कृति कवि विधता आणि संस्कृती च्या शाश्वत विकासा साठी च्या योगदाना विषयी कृतज्ञता, पात्रशिक्षकां चेप्रमाण लक्षणीयरी त्या वाढवणे, हे प्रमुखशै क्षणिक लक्ष्य आहेत.



**भारताचीSDG 4साठीवचनबद्धता**

भारत हाजागतिक SDG वचन बद्धते तील प्रमुख भागीदारां पैकी एक आहे. सुमारे 26 कोटी विद्यार्थ्यांचे घर असणाऱ्या भारताने, SDGs साध्यकरण्याच्या दृष्टिने आपली सर्वधोरणे, कार्यक्रम आणि योजनासंरे खितकेल्या आहेत.SDG4 साठी भारताच्या दृढवचनबद्ध तेचीझलक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्येदिसते. SDG च्या घोषणे नंतरचेहेपहिले शैक्षणि कधोरण आहे, ज्याचा उद्देश आपल्या देशाच्या वाढत्या विकासात्म कगरजे कडेल क्षदेणे आहे. SDG4 सह 21 व्याशत कातील महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांना संरे खितकरण्या साठी शैक्षणिक संरचनेच्या सर्व पैलूंची उजळणी आणि सुधारणा करण्याचा प्रस्ताव, NEP नेभारताच्या परंपरा आणि मूल्य प्रणालीं चीउभारणी करताना दिला आहे.

6 ते 14 वर्षे वयोगटा तील मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्या साठी शिक्षण हक्कका यद्याची अंमलबजावणी, सर्वांनाशिक्षण अनिवार्य करण्याच्या भारताच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे. यामुळे प्राथमिक शिक्षणाचा एकूणनों दणीदर सुधारला आहे.

शालेय शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालयाने 1 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2026 या काला वधीत 294283.04 कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चा सहराब विण्यात येणाऱ्या NEP 2020 च्या ध्येय आणि उद्दिष्टां साठी त्यांच्या प्रमुख समग्र शिक्षा योजनां मध्ये सुधारणा केली आहे.समग्र शिक्षाही शालेय शिक्षणा तील एकत्री कृत योजना आहे,जीपूर्व प्राथमिक तेइयत्ता 12 वीपर्यंत SDG4 सोबत संरेखित केलेली आहे,जेणे करून सर्व मुलांना समान आणि विकसित वर्गां सोबत चदर्जेदार शिक्षण मिळूशकेल.

विभागाने 54061.73 कोटी रुपये आर्थिक खर्चासह, 2021-22 ते 2025-26 या पाचव र्षांच्या काला वधी साठी प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (PM POSHAN) देखील सुरुकेले आहे. त्यातबाल वाटि केसह माध्यान्ह भोजनाचे सर्व घटक समाविष्ट आहेत. ही योजना SDG 2 आणि 4 यांना शालेय शिक्षणा मध्ये समाविष्ट करण्या संबंधित आहे. इयत्ता 1 ते 8 वीमध्ये शिकणाऱ्या मुलांची पोषण स्थिती सुधारणे, गरीब मुलांना नियमित पणे शाळेत जाण्या साठी प्रोत्साहित करणे आणि त्यांनाव र्गातीलउप क्रमांवर लक्ष केंद्रित करण्या समदत करणे, हा PM POSHAN चाउद्देश आहे.

**SDG 4चे स्थानिकीकरण**

SDG साध्य करण्या साठी सर्व, विशेषतः तळागाळा तीलस्तरांची खात्री आणि वचन बद्धता स्थानिकी करणा मुळे निश्चित होऊशकते. जो पर्यंतते प्रशासन आणि अंमलब जावणीच्या सर्वस्तरां पर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंतहे खऱ्या अर्थाने साध्य करणेअश क्य आहे. सर्व SDG चे लक्ष्यथेट स्थानिक आणि प्रादेशिकसर कारांच्या जबाब दाऱ्यांशी संबंधित आहेत. राष्ट्रीय, राज्य/केंद्रशासित प्रदेश, जिल्हा, ब्लॉक आणि गाव पातळीवर प्रगती मो जण्या साठी आणि निरीक्षण करण्या साठी लक्ष्य निर्धारित करण्या पासून, अंमलब जावणी चीपद्धत निश्चित करणे आणि निर्देश कांचावापर करणे, अति शयमहत्त्वाचे आहे. लोकचळवळी आणि समाज, स्वयंसेवी संस्था, नागरीसं स्थासं घटनायां चासह भाग आणि सहयोग महत्त्वपूर्ण भूमिका बजावूशकतो, म्हणून लोकां मध्ये जागरुकता वाढवणे महत्त्वाचे आहे. आपल्या गावां मध्ये आणि शाळांमध्ये SDG 4 आमलात आणण्याच्या आपल्या क्षमतेवर SDG 4 चीउपलब्धी अवलंबूनअसेल.

संचालक, शालेय शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

शालेय परिसंस्थेमध्ये 15 लाखां हून अधिक शाळा, 26 कोटीं हून अधिक विद्यार्थी आणि पूर्व प्राथमिक ते वरिष्ठ माध्यमिक स्तरावरील 96 लाख शिक्षकांचा समावेश आहे. यात सर्वभागधारकां चा जसे की, शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी, पालक, समुदाय, शाळाव्यव स्थापनस मित्या, SCERTs, DIETs, BITEs, ब्लॉक रिसोर्स पर्सन, क्लस्टर रिसोर्स पर्सन, दर्जेदार, समावेशक आणि न्याय्य शिक्षण देणारे स्वयंसेवक, समावेश आहे. आपल्या राज्यघटनेने स्थानिकी करणाचे महत्त्व ओळखून शिक्षणाचा समवर्ती यादीत समावेश केला आहे.

SDG4 च्या स्थानिकी करणा ची प्रक्रिया विविधपा यऱ्या आणि स्तरांव रबघता येते.

### केंद्र स्तरावर

समग्र शिक्षा योजना सर्व स्तरांवर नियोजन, अंमलबजावणी यंत्रणा आणि व्यवहार खर्चात मदत करते.मुलींच्या आणि विशेष गरजा असलेल्या मुलांच्या सर्वसमावेशक शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी, गुणवत्ता आणि नाविन्यपूर्ण घटक RTE अंतर्गत लाभार्थी अभिमुख हक्क, शालेय अनुदान, अर्ली चाइल्डहुड केअर आणि शिक्षण आणि मूलभूत साक्षरता आणि संख्यात्मकता, समानता आणि समावेश, शिक्षण साहित्य, शाळेतील नेतृत्वाचे प्रशिक्षण आणि SMC/शिक्षकांची क्षमता वाढवणे, ICT, स्मार्ट क्लासरूम, डिजिटल, व्यावसायिक हस्तक्षेप इ. वापरासाठी, केंद्र प्रकल्प मंजूरी मंडळ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांशी चर्चा करते आणि विशिष्ट आर्थिक वर्षासाठी भौतिक आणि आर्थिक मान्यता प्रदान करते. ही योजना जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावरील यंत्रणा आणि संसाधने अंमलबजावणीसाठी वापरते.

शालेय शिक्षण विभागाने NEP 2020 च्या अंमलबजावणी साठी "सार्थक" ही एक व्यापक योजना तयार केली आहे.विविध लक्ष्येआणि KPIs निर्धारित करणे, राष्ट्रीय अभ्यास क्रमाच्या चौकटीतून धोरण आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, NIPUN भारत, NISHTHA शिक्षक प्रशिक्षण, लर्निंग एन्हांसमेंट प्रोग्राम आणि रेमेडियल टीचिंग टू असेसमेंट रिफॉर्म हे दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

MoE ने 12 नोव्हेंबर 2021 रोजी देशभरात इयत्ता 3, 5, 8 आणि 10 मधील जवळपास 34 लाख मुलांच्या शिक्षणाच्या परिणामाचे मूल्यांकन करून राष्ट्रीय उपलब्धी सर्वेक्षण (NAS) केले.राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा अहवालांच्या स्वरूपात NAS 2021 मधील निष्कर्ष प्रकाशित केले जातील, जे स्पेक्ट्रममधील कामगिरीची तुलना करण्यास आणि विविध स्तरांवर उपाय करण्यास आवश्यक पावले उचलण्यास मदत करतील.परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स (PGI) ही संकल्पना शालेय शिक्षणाच्या क्षेत्रात बदल घडवून आणण्याकडे लक्ष पुरवते, जे आता शिक्षणाच्या गुणवत्तेकडे केंद्रित झाले आहे.70 निर्देशकांचा समावेश असलेला निर्देशांक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना बहुआयामी हस्तक्षेप करण्यास प्रवृत्त करतो.आता, या निर्देशांकाचे स्थानिकीकरण करण्याचे आणि जिल्ह्यांना प्रोत्साहन देण्याचे आणि जागरूक करण्याचे, जिल्हानिहाय पीजीआय हे आणखी एक पाऊल आहे.

### राज्ये/केंद्रशासित प्रदेश स्तरावर

समग्र शिक्षा सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील जिल्ह्यांमध्ये खालच्या स्तरापासून केंद्राच्या उच्च स्तरापर्यंत समन्वय साधून योजना आखते आणि त्याची अंमलबजावणी करते.भारत हे वैविध्यपूर्ण राष्ट्र आहे. विविध गटांना संबोधित करण्यासाठी योजनांच्या घटकांचे स्थानिक गरजांनुसार संदर्भ देणे महत्त्वाचे आहे.राज्य मंडळांची संकल्पना आणि राज्य अभ्यासक्रम हे शिक्षणाच्या स्थानिकीकरणाचे सार दर्शवितात. SCERT आणि राज्य/केंद्रशासित प्रदेशातील इतर विविध संस्था शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीत मदत करतात.गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्यासंधीसाठी विशिष्ट राज्य प्रकल्पांचे नियोजन केले आहे.

### जिल्हा स्तरावर

मूलभूत अंमलबजावणी एकक असल्यामुळे, नियोजनाचे स्थानिकीकरण आणि देखरेख आणि जिल्हा स्तरावर समग्र शिक्षा या एकत्रित योजनेची अंमलबजावणी हे वैशिष्ट्यपूर्ण आहे.जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्था (DIETs) सातत्याने शिक्षकांचा व्यावसायिक विकास, शालेय समर्थन आणि सुधारणेसाठी आणि जिल्हा स्तरावर नविन कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी समर्थन करतात.



Folk Music under Ek Bharat Shreshtha Bharat

### गट/क्लस्टर(सामुहिक) स्तरावर

गट आणि सामुहिक स्तरावर शालेय स्तरावरील शिक्षणाच्या गुणवत्तेची खात्री आणि मूल्यांकन करण्यासाठी आणि वेळेवर प्रतिबंधात्मक हस्तक्षेप प्रदान करण्यासाठी, ब्लॉक रिसोर्स सेंटर आणि क्लस्टर रिसोर्स सेंटर हे सर्वात महत्त्वपूर्ण युनिट्स आहेत.BRCs आणि CRCs हे शैक्षणिक संसाधनांचे भांडार म्हणून कार्य करतात, सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण आयोजित करतात, नियमित शाळेला भेट देतात आणि शिक्षक आणि शाळांना शैक्षणिक समर्थन देतात तसेच समुदाय एकत्रीकरण उपक्रमांमध्ये मदत करतात, इतर राज्य/जिल्हा स्तरावरील संरचनांशी जोडतात.स्थानिक स्तरावर प्रशिक्षण सहाय्य प्रदान करण्यासाठी, ब्लॉक इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन (BITEs) सुद्धा परिकल्पित आहेत.

### शालेय स्तरावर

प्री-स्कूल ते वरिष्ठ माध्यमिक इयत्तेपर्यंत सर्वसमावेशक आणि न्याय्य दर्जाचे शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी प्राथमिक एकक म्हणून शाळेची कल्पना SDG 4 नुसार करण्यात आली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला पाठिंबा देऊन सक्षम करणे आणि आजीवन शिक्षण आणि रोजगारक्षमता मजबूत करणे महत्त्वाचे आहे.शालेय स्तरावर सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक प्रदर्शन आणि प्रशिक्षण सुधारणे आणि नविन संस्कृतीक रचनेच्या कल्पने चा प्रचार, पालनपोषण आणि प्रगती साधणे आवश्यक आहे.NEP ने शिक्षकांना वर्गातील व्यवहारांमध्ये नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र शोधण्यासाठी आणि लागू करण्यासाठी प्रोत्साहित केले.संपूर्ण शाळा' आधारित नियोजन आणि अंमलबजावणी हा दृष्टीकोनातील आमूलाग्र बदलआहे.

अध्यापन शिकण्याची प्रक्रिया सुधारण्यासाठी शाळांना थेट अनुदानदिले जाते.अकार्यक्षम शालेय उपकरणे बदलण्यासाठी आणि इतर वारंवार येणारे खर्च जसे की खेळाचे साहित्य, क्रीडा उपकरणे, प्रयोगशाळा, वीज शुल्क, इंटरनेट, पाणी, अध्यापन साहाय्य इत्यादींसाठी वार्षिकशालेय संयुक्त अनुदान दिले जाते. ग्रंथालय हा एक आवश्यक घटक आहे.वाचनाची सवय वाढावी म्हणूनग्रंथालय अनुदान दिले जाते. मुलांच्या सर्वांगीण विकासाची गरज लक्षात घेऊन सर्व शाळांमध्ये योगासने आणि शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले जाते.क्रीडा साहित्य खरेदी, उपक्रम आयोजित करणे, स्पर्धा इत्यादींसाठी शारीरिक शिक्षण आणि खेळासाठी आर्थिक सहाय्य प्रदान केले जाते.



विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शाळांचे ॲक्टिव्हिटी सेंटरमध्ये रूपांतर करायचे आहे.विविध क्लब जसे की वादविवाद, संगीत, कला, क्रीडा, वाचन, युवक, विज्ञान किंवा इको क्लब हे जीवन कौशल्ये, छंद, आत्मसन्मान निर्माण करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि लवचिकता विकसित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.शाळा हे शिक्षणासाठी आनंददायी ठिकाण बनवण्याच्या दृष्टिकोनातून, शाळा विद्यार्थी आणि शिक्षक दोन्हींसाठी उपक्रम आयोजित करतात. कला उत्सव, भूमिका स्पर्धा, बँड स्पर्धा, संगीत शिक्षक स्पर्धा आणि लोकनृत्य स्पर्धा असे काही उपक्रम राबवले जातात.NEP ने शाळांचा वापर "सामाजिक चेतना केंद्र" म्हणून केला जाईल अशी कल्पना केली आहे. अंमलबजावणीमध्ये योग्य ताळमेळ आणि या संसाधनांचा कार्यक्षम वापर,SDG4 साध्य करण्याचा मार्ग मोकळा करेल.विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शाळांचे ॲक्टिव्हिटी सेंटरमध्ये रूपांतर करायचे आहे.विविध क्लब जसे की वादविवाद, संगीत, कला, क्रीडा, वाचन, युवक, विज्ञान किंवा इको क्लब हे जीवन कौशल्ये, छंद, आत्मसन्मान निर्माण करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि लवचिकता विकसित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.शाळा हे शिक्षणासाठी आनंददायी ठिकाण बनवण्याच्या दृष्टिकोनातून, शाळा विद्यार्थी आणि शिक्षक दोन्हींसाठी उपक्रम आयोजित करतात. कला उत्सव, भूमिका स्पर्धा, बँड स्पर्धा, संगीत शिक्षक स्पर्धा आणि लोकनृत्य स्पर्धा असे काही उपक्रम राबवले जातात.NEP ने शाळांचा वापर "सामाजिक चेतना केंद्र" म्हणून केला जाईल अशी कल्पना केली आहे. अंमलबजावणीमध्ये योग्य ताळमेळ आणि या संसाधनांचा कार्यक्षम वापर,SDG4 साध्य करण्याचा मार्ग मोकळा करेल.

**सामाजिक सहभाग आणि खाजगी, स्वयंसेवी संस्था, नागरी संस्था संघटना**

SDG4 चे स्थानिकीकरण केवळ खालच्या प्रशासकीय घटकापुरते मर्यादित न राहता सर्व भागधारकांसाठी असावे. जेव्हा सर्व भागधारक एकत्रितपणे सहकार्य करतील, तेव्हाच सार्वत्रिक दर्जेदार शिक्षण प्राप्त होऊ शकते.शालेय विकास योजना तयार करण्यासाठी सामाजिक सदस्य आणि स्थानिक प्राधिकरणासह शाळा व्यवस्थापन समित्यांची स्थापना केली जाते. खाजगी आणि स्वयंसेवी क्षेत्राची भूमिका या पारिस्थितिचा महत्त्वाचा भाग आहे.ते कौशल्य तसेच नाविन्यपूर्ण पद्धती आणतात.क्षमता निर्माण, पायाभूत सुविधा आणि अध्यापन-प्रशिक्षण प्रक्रियेला समर्थन देण्यासाठी एनजीओ/सीएसओ/कॉर्पोरेट्सचे सहकार्य देखील शैक्षणिक कारणांमध्ये भर घालते. पालकही घरगुती मार्गदर्शक या नात्याने शैक्षणिक परिणामांच्या वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.MoE चा विद्यांजली उपक्रम पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आणि शैक्षणिक परिणामांमध्ये वाढ करण्यासाठी सर्वांच्या पाठिंब्याला प्रोत्साहन देतो. शिक्षणाच्या सार्वत्रिक संधी निश्चित करण्यासाठी लोकांच्या पाठिंब्याने शैक्षणिक गळती आणि शाळाबाह्य मुलांच्या समस्या सहजपणे सोडवल्या जाऊ शकतात.



**सर्व मंत्रालये आणि विभागांशी अभिसरण**

SDGs साध्य करण्यासाठी सर्व मंत्रालये/विभागांसोबत अभिसरण महत्वाचे आहे, कारण सर्व उद्दिष्टे परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी आहेत. SDG चे स्थानिकीकरण सर्व योजनांचे एकत्रिकरण शालेय आणि गावपातळीवरील मूलभूत एककावर अधिक प्रभाव पाडण्यासाठी आवश्यक आहे.यामुळे प्रयत्न, संसाधने आणि उर्जेचाअपव्यय टाळून समन्वयाने काम करण्याची संधी मिळते.ECCE लिंकेजसाठी WCD मंत्रालय, सुरक्षित पेयजल आणि स्वच्छता यासाठी पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय, अपंग व्यक्तींना एड्स/उपकरणे खरेदी/फिटिंगसाठी सहाय्य योजना, बालमजुरीतून काढून टाकलेल्या सर्व मुलांना जवळपासच्या शाळांमधून यशस्वीपणे मुख्य प्रवाहात

आणण्यासाठी श्रम आणि रोजगार मंत्रालयासोबत प्रयत्न केले जात आहेत.आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे शालेय आरोग्य कार्यक्रम, शाळांमध्ये क्रीडांगण, संरक्षक भिंती, रॅम्प, स्वच्छतागृहे इत्यादींची तरतूद आणि स्वयंसहाय्यता गटांद्वारे शालेय गणवेशाची तरतूद, पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठीएमओपीआर, कचऱ्याचा पुनर्वापर, शौचालय आणि स्वयंपाकघरांसह शालेय परिसराची देखभाल.शाळांमध्ये भारत नेट सेवांचा विस्तार करण्यासाठी दूरसंचार विभाग, कौशल्य उपक्रमांसाठी MSDE, खेलो इंडियामध्ये अधिक सहभागासाठी आणि युवा स्वयंसेवकांना शाळांसोबत जोडण्यासाठी क्रीडा आणि युवा व्यवहार विभाग.ग्रामपंचायत SDG4 साध्य करण्यासाठी समग्र शिक्षा आणि PM POSHAN च्या विविध हस्तक्षेपांची योजना आणि अंमलबजावणी, विकास आराखड्या (GPDP) द्वारे शालेय स्तरावर केली जाऊ शकते.

## COVID-19 महामारी आणि स्थानिकीकरणाची गरज

कोविड-19 चा शिक्षणावर गंभीर परिणाम झाला आहे. शाळा बंद असण्याचा मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर परिणाम होतो.अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवरील व्यवस्थापन परिणामकारक आणि महत्त्वाचे असल्याचे या साथीच्या आजाराने दाखवून दिले. विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी आपण शाळा आणि गाव पातळीवर अनेक प्रयत्न होताना पाहिले आहेत.जेव्हा शाळा बंद कराव्या लागल्या आणि बाहेरून कोणतीही मदत मिळू शकली नाही, तेव्हा स्थानिक स्तरावरील विविध पातळ्या म्हणजे- मोहल्ला पाठशाळा, घरांच्या भिंती रंगवून विद्यार्थ्यांना शिकवणे इत्यादींनी शिक्षण सुरू ठेवण्यासाठी आणि शैक्षणिक त्रुटी भरुन काढून नुकसान कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.वास्तविक, स्थानिकीकरण प्रणालीला कुठल्याही परिस्थितीततिचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिक लवचिक बनविण्यात मदत करते.

## निष्कर्ष

शाश्वत विकास, राष्ट्र उभारणी आणि शांततेसाठी शिक्षण ही एक शक्ती आहे.स्थानिक विकास धोरणासाठी,SDG चे स्थानिकीकरण एक फ्रेमवर्क प्रदान करून देशभरातील लोकांच्या विविध गरजा पूर्ण करू शकते.सार्वत्रिक दर्जेदार शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी " सर्वांसाठी एक आकार" असा दृष्टिकोन असूनचालणार नाही. एसडीजी इंडिया इंडेक्स विविध SDG वर राज्यांच्या कामगिरीची तुलना करतो. एसडीजी निर्देशांकाचे जिल्हा आणि गाव पातळीवर स्थानिकीकरण करण्याची गरज आहे.हे त्यांना त्यांच्या पातळीवर SDG साध्य करण्यासाठी धोरणे तयार करण्यासाठी, अंमलबजावणीसाठी आणि कामगिरीचे मोजमाप करण्यासाठी प्रेरित आणि प्रोत्साहन देईल. स्थानिकीकरणामुळे आपली क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढेल. शैक्षणिकSDG साध्य केले, तर 2030 पर्यंत इतर सर्व उद्दिष्टे साध्य होतील, तेव्हा नक्कीच हे जग राहण्यासाठी एक चांगले ठिकाण असेल.

****

# सुधारित राष्ट्रीय पंचायत पुरस्कार

डॉ.बिजयकुमार बेहरा - आई. ई. एस.




### 1 पार्श्वभूमी:

1.1 SDGs साध्य करण्या साठी प्रमुख योजना/कार्यक्र मांच्या अंमल बजावणीत पंचायती महत्त्वाची भूमिका बजाव तात. विकासात्मक योजनांच्या सर्वांगीण अंमलब जावणी साठी निरोगी आणि स्पर्धात्मक परिसंस्था निर्माण करण्याचा, पंचायतींना प्रोत्साहन देणे आणि त्यांना पुरस्कार प्रदान करणे हा अविभाज्य भाग आहे.म्हणून पंचायती राज मंत्रालय, सुधारित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (RGSA) च्या केंद्र प्रायोजित योजनेच्या केंद्रीय घटकांपैकी एक असलेल्या पंचायतींच्या प्रोत्साहन योजनेंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायतींना, राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांद्वारे प्रोत्साहन देत आहे. सामान्यत: हे पुरस्कार दरवर्षी 24 एप्रिल रोजी दिले जातात, 1992 साल चा 73 वी घटना दुरुस्ती कायदा, 24 एप्रिल 1993 पासून लागू झाल्यामुळे हा दिवस राष्ट्रीय पंचायती राज दिवस म्हणून साजरा केला जातो.

1.2 तज्ञ समितीने तयार केलेल्या पंचायती राज संस्थांद्वारे शाश्वत विकास लक्ष्यांचे स्थानिकीकरण (LSDGs) अहवाल मंत्रालयाने प्रसिद्ध केला आहे.समितीने आपल्या अहवालात 2030 पर्यंत SDGs साध्य करण्याचा मार्ग म्हणून स्थानिक (ग्रामपंचायत) स्तरावर कृती करण्यासाठीएकूण9 विषयांवर17 SDGs सुचवल्या आहेत. हे 9 विषय पुढीलप्रमाणे आहेत (i) दारिद्र्यमुक्त आणि प्रगत उपजीविकेचे गाव, (ii) निरोगी गाव, (iii) बालस्नेही गाव, (iv) मुबलक पाण्याचे गाव, (v) स्वच्छ आणि हरित गाव, (vi) स्वयंपूर्ण पायाभूत सुविधांचे गाव, (vii) सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव, (viii) सुशासन असलेले गाव आणि (ix) महिला-स्नेही गाव.

### 2 - तर्क:

पंचायत स्तरावर SDGs साध्य करण्यासाठी पद्धतशीर नियोजन, अंमलबजावणी, देखरेख, उत्तरदायित्व आणि आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी राज्यघटनेच्या भाग-IX मध्ये सूचीबद्ध केलेल्या 29 विषयांवर विविध पर्यावरण-सामाजिक विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी PRIs ला प्रोत्साहन देणे, ब्लॉक, जिल्हा, राज्य/केंद्रशासित प्रदेश आणि राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार स्पर्धेची बहु-स्तरीय पिरॅमिडिकल रचनास्थापित करण्यासाठी, राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे आणि ते
एलएसडीजी च्या 9 विषयांसह संरेखित केले आहेत:

1 - सुचवल्या गेलेल्या 9 विषयांमार्फतSDGs प्राप्त करण्यासाठी PRIs च्या कामगिरीचे मूल्यांकन करा
2 - PRIs मध्ये स्पर्धात्मक भावना वाढवणे
3 -'पीआरआयद्वारे SDGs चे स्थानिकीकरण' प्रक्रियेला चालना द्या आणिPRIs ची2030 पर्यंत एलएसडीजी मिळवण्याच्या दृष्टिने जनजागृती करा

### 4 - प्रक्रिया/रचना/निवड:

4.1 सुधारित राष्ट्रीय पंचायत पुरस्कार, पंचायतींना सर्व 9 पुरस्कार विषयांमध्ये सहभागी होण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करेल. सर्व पंचायतींना प्रत्येक विषयांतर्गत त्यांच्या कामगिरीच्या आधारे क्रमवारी दिली जाईल.ब्लॉक स्तरीय थीमॅटिक समित्यांद्वारे त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाईल आणि क्रमवारीतीलवरच्या 3 पंचायतींची शिफारस जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी केली जाईल. यानंतर जिल्हा आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश देखील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी प्रत्येक विषयांतर्गत क्रमवारीतीलवरच्या 3 पंचायतींचे मूल्यांकन आणि शिफारस करतील.विविध स्तरांवरील निवड समित्या पंचायतींच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी नोडल विभाग/मंत्रालयांना सहभागी करून घेतील.

4.2 प्रत्येक विषयासाठी संबंधित विषय-स्तरीय निवड समित्या पुरस्कारप्राप्त पंचायतींची निवड करतील. पंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य/केंद्रशासित प्रदेश ब्लॉक, जिल्हा आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश, पुरस्कार विजेत्यांना रोख रक्कम किंवा कुठल्याही प्रकारे सन्मानित करू शकतात.

आर्थिक सल्लागार, पंचायती राज मंत्रालय

## 5. प्रतिसादांसाठी प्रश्नावली

देशभरातील सर्व ग्रामपंचायतींचे मूल्यांकन आणि क्रमवारी ठरवण्यासाठी MoPR ने मंत्रालय/विभाग आणि राज्ये/केंद्रशासित प्रदेशांशी सल्लामसलत करून प्रत्येक विषयासाठी प्रश्नावली तयार केली आहे.

## 6. PRIs चा सहभाग:

सुधारित प्रणाली अंतर्गत, सर्व (सुमारे 2.56 लाख) ग्राम पंचायती आणि तत्सम स्तरावरील पारंपारिक स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्व 9 थीमॅटिक अवॉर्ड अंतर्गत सहभाग नोंदवावा लागेल.

## 7. पुरस्कारांच्या श्रेणी:

7.1 राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार ग्राम, गट आणि जिल्हा पंचायतींना खालील दोन श्रेणींमध्ये दिले जातील:
i. दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार (वैयक्तिक विषयवार कामगिरीसाठी)
ii.नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार (सर्व थीम विषयांतर्गत एकूण कामगिरीसाठी).

7.2 याशिवाय, खालील विशेष श्रेणीतील पुरस्कारांचाही विचार केला जाईल:

i. अक्षय ऊर्जा स्त्रोतांच्या अवलंबन आणि वापरासाठी ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कार.

ii.नेट-झिरो कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या उल्लेखनीय कार्यासाठी कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत पुरस्कार.

iii. जे ग्रा.पं.साठी पात्र ठरतात आणि लागोपाठ राष्ट्री य पंचायत पुरस्काररांसाठी निवडले जातात, त्यांच्यासाठी नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार.

iv. ज्या संस्थांनी LSDGs साध्य करण्यासाठी ग्रा.पं.ना संस्थात्मक सहाय्य दिले, अशा संस्थांसाठी पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था पुरस्कार.

v. सर्वोत्कृष्ट सहभागी राज्य/केंद्रशासित प्रदेश/जिल्हा/गट पंचायत.

## 8. पुरस्कारांसाठी संचालन प्रक्रिया::

8.1 मंत्रालयाने खालील कागदपत्र तयार करून ते राज्य/केंद्रशासित प्रदेशांसोबत सामायिक केले आहेत:

• संचालन प्रक्रिया (SoP), सुधारित पुरस्कारांबाबत राज्य/केंद्रशासित प्रदेश, जिल्हा आणि गट स्तरीय अधिकाऱ्यांच्या कॅस्केडिंग मोड ऑफ ओरिएंटेशन आणि ग्रामपंचायतींद्वारे ऑनलाइन प्रश्नावली भरण्याच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठीच्या वेळेसह.

• राष्ट्रीय पंचायत पुरस्कार पोर्टलवर अर्ज/डेटा एंट्री संबंधित तांत्रिक बाबींवर SoP

8.2 सुधारित अर्ज प्रक्रियेवर मार्ग विभागातील राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या अधिकाऱ्यांनाअभिमुखता प्रदान करण्यासाठी, जी पुढे पंचायती राज संस्थां (PRIs) पर्यंत कॅस्केड मोडमध्ये पसरवली जाईल, सुधारित राष्ट्रीय पंचायत पुरस्कारासाठीरोड मॅपच्या तयारीवर राष्ट्रीय लेखन- कार्यशाळा 16-18 ऑगस्ट 2022 दरम्यान नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमादरम्यान, राज्य/केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या स्तरावर कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी, मोठ्या प्रमाणात सहभागासाठी, संपूर्ण पुरस्कार प्रणालीच्या लोकप्रियतेसाठी आणि प्रसिद्धीसाठी राष्ट्रीय माध्यम धोरण देखील सादर केले गेले.

9. पुरस्कार पोर्टल:

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार पोर्टल (www.panchayataward.gov.in) यासाठी उपलब्ध असेल:

• पंचायतींमार्फत पुरस्कारासाठी अर्ज.

• विविध स्तरांवर (राष्ट्रीय, राज्य/केंद्रशासित प्रदेश, जिल्हा आणि ब्लॉक) प्रश्नावली भरण्याचे निर्देशन आणि निरीक्षण.

****

# पंचायतीं चा शाश्वत विकास उद्दिष्टां च्या स्थानिकीकरणाच्या दिशेने प्रवास

सीबी, विभाग, पंचायती राज मंत्रालय

1 - भारत शाश्वत विकासाच्या 2030 च्या अजेंडावर स्वाक्षरी करणारा देश असून त्याच्या यशासाठी वचनबद्ध आहे.NITI आयोग ही शाश्वत विकास उद्दिष्टां (SDGs) च्या अंमलबजावणीसाठीची नोडल संस्था आहे.NITI आयोगाने नॅशनल इंडिकेटर फ्रेमवर्क डेटा वापरून SDG इंडिया इंडेक्स तयार केला. विविध मंत्रालये आणि त्यांच्या योजनांचीSDGs आणि लक्ष्यांसह आखणी केली जाते.

2 - भारतातील जवळपास 70% लोक ग्रामीण भागात राहतात हे लक्षात घेता, राष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पंचायती राज संस्थांच्या माध्यमातून तळागाळापर्यंत पोहोचणारी कृती आवश्यक असेल.त्यामुळे, पंचायती राज संस्थांची विशेषत: ग्रामपंचायतींची SDG चे स्थानिकीकरण करण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे.

3 - पंचायती राज मंत्रालयाने SDG साठी एक विषयवार दृष्टीकोन विकसित केला असूनत्यात 9 विषय विकसित केल्या गेले आहेत. यापैकी प्रत्येक विषयामध्ये अनेक SDGs समाविष्ट आहेत.

| Theme | Related SDGs |
|---|---|
| 1. Poverty Free Village and Enhanced Livelihood | SDG 1: No Poverty<br>SDG 2: Zero Hunger<br>SDG 3: Good Health and Well Being<br>SDG 4: Quality Education<br>SDG 5: Gender Equality<br>SDG 6: Clean Water and Sanitation<br>SDG 7 : Affordable and Clean Energy<br>SDG 8: Decent Work and Economic Growth<br>SDG 10: Reduced Inequalities<br>SDG 11: Sustainable Cities and Communities<br>SDG 13: Climate Action<br>SDG 15: Life on Land |
| 2. Healthy Village | SDG 2: Zero Hunger<br>SDG 3: Good Health and Well Being<br>SDG 4: Quality Education<br>SDG 5: Gender Equality<br>SDG 6: Clean Water and Sanitation<br>SDG12: Responsible Consumption and Assumption |
| 3. Child Friendly Village | SDG 1: No Poverty<br>SDG 2: Zero Hunger<br>SDG 3: Good Health and Well Being<br>SDG 4: Quality Education<br>SDG 5: Gender Equality |
| 4. Water Sufficient Village | SDG 1: No Poverty<br>SDG 2: Zero Hunger<br>SDG 3: Good Health and Well Being<br>SDG 4: Quality Education<br>SDG 5: Gender Equality<br>SDG 6: Clean Water and Sanitation<br>SDG 8: Decent Work and Economic Growth<br>SDG 9: Industry, Innovation and Infrastructure<br>SDG 10: Reduced Inequalities<br>SDG 11: Sustainable Cities and Communities<br>SDG 12: Responsible Consumption and Assumption<br>SDG 13: Climate Action<br>SDG 14: Life Below Water<br>SDG 15: Life on Land |
| 5. Clean and Green Village | SDG 6: Clean Water and Sanitation<br>SDG 7: Affordable and Clean Energy<br>SDG 12: Responsible Consumption and Assumption<br>SDG 13: Climate Action<br>SDG 14: Life Below Water<br>SDG 15: Life on Land |
| 6. Self Sufficient Infrastructure Gram Panchayat | SDG 1: No Poverty<br>SDG 2: Zero Hunger<br>SDG 4: Quality Education<br>SDG 5: Gender Equality<br>SDG 6: Clean Water and Sanitation<br>SDG 9: Industry, Innovation and Infrastructure<br>SDG 11: Sustainable Cities and Communities |
| 7. Socially Secured Village | SDG 1: No Poverty<br>SDG 2: Zero Hunger<br>SDG 5: Gender Equality<br>SDG 10: Reduced Inequalities<br>SDG 16: Peace, Justice and Strong Institutions |
| 8. Good Governance | SDG 16: Peace, Justice and Strong Institutions |
| 9. Women Friendly Village | SDG 1: No Poverty<br>SDG 2: Zero Hunger<br>SDG 3: Good Health and Well Being<br>SDG 4: Quality Education<br>SDG 5: Gender Equality<br>SDG 8: Decent Work and Economic Growth |

4 - पंचायतींमार्फत समाजाचा सहभाग करून घेऊन; या विषयासंबंधीचा दृष्टीकोन स्वीकारणे, समजणे आणि त्याची अंमलबजावणी करणे सोपे जाईल.

5 - 5.यातील प्रत्येक विषयामध्ये अनेक SDGs समाविष्ट आहेत, ज्यांची एक विषयवार दृष्टिकोन स्वीकारून, विविध मंत्रालये आणि योजनांद्वारेआखणी केली जाते. यामुळे संसाधनांचे एकत्रीकरण होईल आणि पंचायत स्तरावर त्यांची उपलब्धता वाढेल.

6 - SDGs च्या स्थानिकीकरणाची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे उपायांची श्रेणी तयार केली गेली आहे, ज्यात केंद्रीय मंत्रालये, राज्य सरकारे, UN एजन्सी, शैक्षणिक संस्था, CSOs आणि इतरांसह एकत्रितपणे काम करत असलेल्या तळागाळातील लोकांचे लक्ष वेधून घेणे समाविष्ट आहे

7- 2018-19 ते 202-21 पर्यंत राबविण्यात आलेल्याRGSA योजनेत सुधारणा करण्यात आली असून13.04.2022 रोजी तिला 01.04.2022 ते 31.03.2026 या कालावधीत अंमलबजावणीसाठी शासनाने मान्यता दिली आहे.सुधारित योजनेचेलक्ष पंचायती राज संस्थांची, स्थानिक स्वराज्य आणि आर्थिक प्रगतीची भक्कम केंद्रे म्हणून पुनर्बांधणी करणे आणि विषयवार दृष्टीकोन स्वीकारून तळागाळातील शाश्वत विकास उद्दिष्टां (SDGs) च्या स्थानिकीकरणावर विशेष लक्ष केंद्रित करण्यावर आहे.

8 -संबंधित केंद्रीय मंत्रालयांसोबत LSDGs प्राप्तीच्या एकत्रित प्रयत्नांसाठी आंतर-मंत्रालयीन बैठका (पिण्याचे पाणी आणि स्वच्छता, ग्रामीण विकास, महिला आणि बाल विकास, शिक्षण, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, नवीन आणि अक्षय ऊर्जा आणि जमीन संसाधने मंत्रालये/विभाग ) आयोजितकरण्यात येतात.

9 -LSDGs एकत्रितपणे पुढे नेण्याच्याउपक्रमांसाठी MoPR सह संबंधित केंद्रीय मंत्रालये/विभागांद्वारे राज्यांना विषयवार संयुक्त सल्ला देण्यात आला आहे.

10 -ग्रामीण भारतातील LSDGs साठी एकत्रितपणे काम करण्यासाठी 21 मंत्रालयांच्या 26 विभागांनी संयुक्त ठरावावर स्वाक्षरीही केली आहे, ज्यामध्ये सरकारी दृष्टीकोनाला मूर्त स्वरूप देण्यात आले आहे.

11 - राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या तयारीची सद्य स्थिती समजून घेण्याच्या उद्देशाने आणि SDGs च्या स्थानिकीकरणावर वेळेत हस्तक्षेपासाठी कृती आराखडा समजून घेण्याच्या उद्देशाने चार प्रादेशिक कार्यशाळा संकरित पद्धतीने आयोजित केल्या गेल्या.

12 -UN एजन्सी (UNICEF, UNDP, UNFPA आणि WHO) च्या LSDG मधील संबंधित डोमेनमध्ये त्यांच्या समर्थनासाठी बैठका आयोजित केल्या आहेत. तसेच, मूलभूत पातळीवर LSDGs मधील सहयोगी कामांसाठी AKAM दरम्यान या एजन्सींसोबत स्टेटमेंट ऑफ अंडरस्टँडिंग (SoU) वर स्वाक्षरी करण्यात आली.

13 -प्रशिक्षण साहित्य विकसित करण्यासाठी MoPR द्वारे 8 विषयवार समित्या स्थापन केल्या आहेत.

- भक्कम डेटा शेअरिंग यंत्रणा विकसित करणे.
- मार्गदर्शक तत्त्वे आणि GPDP च्या स्वरूपात सुधारणा करून ते LSDGs केंद्रित बनवणे.
- पंचायत विकास निर्देशांक (PDI) तयार करणे.
- 2014 मध्ये तयार केलेल्या राष्ट्रीय क्षमता बांधणी फ्रेमवर्कला LSDGs केंद्रित बनवण्यासाठी त्याचे पुन:परीक्षण करणे.
- LSDGs क्षेत्रांवर विषयवार प्रशिक्षण मॉड्यूल.
- पंचायतीद्वारे LSDGs मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कोअर कमिटी.




14 -मंत्रालयाने 11-17 एप्रिल 2022 या कालावधीत 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत SDGs च्या स्थानिकीकरणावर लक्ष केंद्रित करून आदर्श सप्ताह साजरा केला.सरकारच्या आणि संपूर्ण समाजाच्या दृष्टिकोनाला मूर्त स्वरूप देण्यासाठी यामध्ये लाइन मंत्री, राज्य पंचायती राज विभाग आणि SIRDs, PRIs संस्थेचे नामनिर्देशित निवडून आलेले प्रतिनिधी (ERs) आणि पारंपारिक स्थानिक संस्था (TLBs), UN एजन्सीज, शैक्षणिक संस्था, डोमेन तज्ञ आणि देशभरातील इतर भागधारक, यांचा सहभाग होता.

15 -मंत्रालयाने राज्य/केंद्रशासित प्रदेशांना 24 एप्रिल 2022 रोजी राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त एक विशेष ग्रामसभा आयोजित करण्याची विनंती केली ज्यामध्ये 1 ते 3 विषयाच्या संपृक्ततेसाठी 'संकल्प' केला जाईल.

16 - 30-31 मे, 2022 रोजी NIRD आणि PR येथे SDGs च्या क्षेत्रातील 11 राज्यांसह LSDGs साठी रोडमॅप आणि कृतीची योजना तयार करण्यावर विचारांचेअदानप्रदान करण्यासाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

17 - 4-6 जुलै, 2022 रोजी सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांसह पंचायतींच्या माध्यमातून LSDGs वरील राज्य कृती आराखडा आणि रोडमॅप तयार करण्यासाठी 3 दिवसांच्या राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

18 - LSDG वरील2 दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा विषयवार दृष्टिकोनातून विषय 6: स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव चंदीगड, पंजाब येथे, विषय 4 आणि 5: मुबलक पाणीआणि स्वच्छ गाव पुणे, पंजाब येथे आणि विषय 1: दारिद्र्य निर्मुलन आणि प्रगतउपजीविका केरळमधील एर्नाकुलम येथे लक्ष केंद्रित करते.

19 - 19. MoPR ने राज्यांना SIRDs/ETCs/PRTCs/SPRCs/DPRCs/BPRCs इत्यादी मधील प्रत्येक प्राधान सदस्यांना 5 GPs नियुक्त करण्याचा सल्ला दिला आहे, जेणेकरूनGPDP द्वारे पंचायतींना संकल्प म्हणून घेतलेल्या थीम्सच्या प्राप्तीसाठी आधार /मार्गदर्शन आणि समर्थन मिळेल.

20 -GPDP मार्गदर्शक तत्त्वे नियोजन प्रक्रियेत विषयवार दृष्टीकोनाच्या एकत्रीकरणाच्या दृष्टीने सुधारणा करण्यात आली आहे.

21 - LSDGs च्या विषयांच्या अनुषंगाने उपक्रमअधोरेखित करण्यासाठी E-ग्रामसाज(Egramsaraj)पोर्टलच्या वैशिष्ट्यांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

22 - 22.GPDP च्या तयारीमध्ये विषयांच्या एकत्रीकरणावर लक्ष केंद्रित करून लोक योजना मोहीम सुरु करण्यात आली आहे.

**पुढीलवाटचाल:-**

• देशाच्या विविध भागांमध्ये LSDG वर विषयावार पध्दतीने राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली जाईल.
• LSDG वर राज्य कृती आराखडा आणि रोडमॅप विकसित केला जाईल आणि राष्ट्रीय कार्यशाळेत त्याचे लॉन्च केले जाईल.

****

# पंचायतीमध्ये विषयवार दृष्टिकोनातून शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणा (एलएसडीजी) साठी 2 दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा

## विषय 6:- स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव

## 22 आणि 23 ऑगस्ट, 2022, चंदीगड, पंजाब

पियाली रॉय चौधरी

Village with Self-Sufficient Infrastructure

**अवलोकन:**

पंचायती राज मंत्रालय PRIs मध्ये शाश्वत विकास उद्दिष्टां (LSDGs) च्या स्थानिकीकरणाची प्रक्रिया सुरू करत आहे.यासाठी, विविध भागधारकांना 'संपूर्ण सरकार आणि संपूर्ण समाज' या दृष्टिकोनातून एका मंचावर एकत्र आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.ग्रामीण भागातील पंचायती आणि इतर संबंधित भागधारकांना सक्षम करून मुलभूत पातळीवर शाश्वत विकास उद्दिष्टां (LSDGs) च्या स्थानिकीकरणासाठी विषयवार दृष्टिकोन, पंचायती राज मंत्रालयाने स्वीकारला आहे.शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानि की करणा चे विषय खालील प्रमाणे आहेत.




**सतत विकास लक्ष्यों के स्थानीयकरण के लिए विषय (themes) निम्नलिखित हैं :**

विषय 1: दारिद्र्य निर्मुलन आणि प्रगत उपजीविका
विषय 2: निरोगी गाव
विषय 3: मुलांसाठी अनुकूल गाव
विषय 4: मुबलकपाणीअसलेलेगाव
विषय 5: स्वच्छआणिहरित गाव
विषय 6: स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव
विषय 7: सामाजिकदृष्ट्यासुरक्षितआणिन्याय्यगाव
विषय 8: सुशासन असलेले गाव
विषय 9: महिलांसाठी अनुकूलगाव

गरिबी, सार्वजनिक आरोग्य, पोषण, शिक्षण, लिंग, स्वच्छता, पिण्याचे पाणी, उपजीविकेच्या साधनांची निर्मिती इत्यादीसारख्या विविध विकासात्मक आव्हानांमध्ये पंचायत महत्त्वाची आणि SDGs सोबत समक्रमित भूमिका बजावते.त्यामुळे, पंचायतींना सुशासनासाठी SDG च्या स्थानिकीकरणातील 9 विषयवार पध्दतींचा अवलंब करणारा प्रमुख खेळाडू म्हणून ओळखले जाते. सुरुवातीला, 22 आणि 23 ऑगस्ट 2022 रोजी पंजाब येथे,विषय 6:-स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव माध्यमातून पंचायतींमध्ये विषयवारदृष्टिकोनातून शाश्वत विकास उद्दिष्टांचे स्थानिकीकरण (LSDGs) यावर 2-दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.राष्ट्रीय कार्यशाळेत सर्व राज्य/ केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी सहभागी झाले.देशभरातील पंचायतींच्या 1300 निवडून आलेले प्रतिनिधींची रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पथदिवे, शाळा, आरोग्य केंद्रे, सामाजिक सेवा केंद्रे,स्थानिक बाजारपेठा, अंगणवाडी केंद्र, पशुधन मदत केंद्र आणि सामाजिक केंद्रया क्षेत्रांमध्ये स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा विकसित करून मूलभूत सेवा पुरवणाऱ्या विविध सर्वोत्तम पद्धती आणि नाविन्यपूर्ण मॉडेल्स सोबतओळख करून देण्यात आली.



**कार्यशाला का उद्देश्य:**

राज्य / केंद्रशासित प्रदेशांनी क्षमता निर्माण आणि प्रशिक्षण; उत्तम सराव; ग्रामपंचायत विकास आराखड्या (GPDP) मध्ये SDGs च्या विषयांची देखरेख, प्रोत्साहन आणि परावर्तन, या संदर्भात अनुकरणीय धोरणे, दृष्टिकोन, अभिसरण क्रिया आणि नाविन्यपूर्ण मॉडेल प्रदर्शित केले आहेत

कंसल्टेंट, सी बी डिवीज़न, पंचायती राज मंत्रालय

### कार्यशाळेची निष्पत्ती:-

मुलभूत पातळीवर विषयवार दृष्टिकोनाद्वारे LSDGs च्या प्रक्रियेला संस्थात्मक रूप देण्यासाठी विविध मॉडेल्सवर पंचायतींच्या तपशीलवार शिक्षणासाठी कार्यशाळेत एक व्यासपीठ प्रदान केले गेले.तसेच, आंतरराष्ट्रीय संस्था आणि स्थानिक प्रशासनातील विनिमयकार्यक्रमांद्वारे माहिती/विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी प्राप्त झाली.

श्री कपिल मोरेश्वर पाटील, माननीय राज्यमंत्री, पंचायती राज, श्री कुलदीपसिंग धालीवाल, माननीय ग्रामीण विकास आणि पंचायत मंत्री आणि पंजाब राज्याचे कॅबिनेट मंत्री, सचिव, MoPR, सचिव, पेयजल आणि स्वच्छता विभाग , मुख्य सचिव, पंजाब, वित्त आयुक्त, सहसचिव, MoPR आणि इतर वरिष्ठ अधिकार्यांनी, पंचायतींमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांच्या स्थानिकीकरणाच्या प्रक्रियेला संस्थात्मक स्वरूप देऊन गावकऱ्यांना मूलभूत सेवा पुरवण्यासाठी विविध तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण मॉडेल्सचा अवलंब करण्याविषयी उल्लेखनीय विचार कार्यक्रमात मांडले.



कार्यशाळेत, LSDGs मध्ये पंजाब राज्याने या प्रक्रियेची गती कायम ठेवण्यासाठी घेतलेल्या काही उपक्रमांचा, जसे की SDG गान; राज्य ग्रामीण उपजीविका अभियान वेबसाइट; प्राइम मोबाइल ॲप; SDG माहितीपत्रक आणि ग्रामसभा पुस्तिका, शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.



पंजाबच्या वेगवेगळ्या ग्रामपंचायतींनी विविध भागधारकांची क्षमता वाढवणे; तंत्रज्ञान आणि मॉडेल्सचा अवलंब करणे आणि आरोग्य क्षेत्रातील सेवांचा दर्जेदार वितरण सुनिश्चित करण्यासाठी स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधी/योजना आणि मानव संसाधनांसह अभिसरण मॅपिंग; पिण्याचे पाणी; शिक्षण; सामान्य सेवा केंद्र; रस्ते; कनेक्टिव्हिटी; स्थानिक बाजारपेठा, मनोरंजन केंद्रे; राहणीमानाच्या सुलभतेसाठी पथदिवे आणि स्वच्छता; याविषयी स्वीकारलेली रणनीती आणि दृष्टिकोन सर्वोत्तम पद्धतीने सामायिक केले आहेत.ग्रामपंचायतीच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींनी, स्वयंपूर्ण पायाभूत सुविधांच्या विविध पैलूंवर योग्य कार्यपद्धतींचा समावेश असलेले लघुपट सामायिक केले.गावपातळीवर नाविन्यपूर्ण मॉडेल्सची प्रतिकृती करण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायतीच्या सरपंच/अध्यक्षांना इतर पंचायत प्रतिनिधींसोबत चांगल्या उदाहरणांचेअदानप्रदान करण्याची संधी मिळाली.



### सर्वोत्तम कार्यपद्धती दर्शविलेल्या ग्रामपंचायतीची नावे खाली नमूद केली आहेत:-

| क्षेत्र | ग्रामपंचायत |
|---|---|
| शिक्षण | सांगोल |
| आरोग्य | रुरका कलान, जालंधर |
| पाणी पुरवठा आणि स्वच्छता | संगरूर |
| ICDS/AWC | S.B.S नगर |

प्रदर्शनात हस्तकला, कुटीर उद्योग आणि ग्रामीण उपक्रमाचे विविध स्टॉल; बचत गट (SHG), SRLM,पंजाबच्या द्वारे उभारले गेले.SHG सदस्यांनी स्थानिक उद्योजकता कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध शेती आणि बिगरशेती उत्पादनांचे प्रदर्शन केले. विविध राज्यांतील ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींनी नाविन्यपूर्ण मॉडेल्स आणि योजना आणि स्वयंपूर्ण पायाभूत सुविधांसह सुशासन बळकट करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, यावर लक्ष केंद्रित करून त्यांचे केस स्टडी सामायिक केले.GP च्या सरपंचांनी, ग्रामीण भागात SDG चे स्थानिकीकरण करण्याच्या यंत्रणेवर प्रकाश टाकणारे लघुपट/चित्रपट दाखवले.

पंजाबमधील समृद्ध संस्कृती, पारंपारिक लोककलांचे चित्रण करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाने गाणे, नृत्य आणि बोलींच्या माध्यमातून सांस्कृतिक वारसा आणि समृद्धीवर प्रकाश टाकला.




**पुढे जाताना:-**

a. ग्रामीण भागात LSDGs च्या संस्थात्मकीकरणात ग्रामपंचायतींनी विषयवार दृष्टिकोनातून अंगीकारलेल्या सर्वोत्तम पद्धतींचेअदानप्रदान करण्याचे व्यासपीठ.
b. ग्रामपंचायतीच्या आत्मविश्वास विकासाद्वारे कौशल्य आणि ज्ञानामध्ये परिवर्तन.
c. सर्वोत्तम पद्धतींचासंचय / संग्रह.
d. LSDGs च्या दृष्टिने ग्रामपंचायतीची क्षमता वाढवणे.
e. एकाच मंचावर निवडून आलेल्या प्रतिनिधींचा मेळा किंवा संगम.
f. हस्तकला आणि ग्रामीण कारागिरांद्वारे स्थानिक परंपरा आणि संस्कृतींचे दर्शन.

****

# शाश्वत विकासासाठी संयुक्त राष्ट्रांचा अजेंडा 2030 साकार करणे दारिद्र्यमुक्त ग्रामपंचायतींवर राष्ट्रीय कार्यशाळा

## गरीबी मुक्त ग्राम पंचायतों पर राष्ट्रीय कार्यशाला: हितधारकों के लिए एक क्रॉस-लर्निंग प्लेटफॉर्म

सुध्दसत्वबारीक आणि प्रियांकादत्ता

सशक्त पंचायत सतत् विकास

संदर्भ आणि पार्श्वभूमी: स्थानिक स्वराज्य विभाग (LSGD), आणि केरळ इन्स्टिट्यूट ऑफ लोकल ॲडमिनिस्ट्रेशन (KILA), केरळ सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने MoPR द्वारे आयोजित 'विषय - 1: दारिद्र्य निर्मुलन आणि ग्रामपंचायत संवर्धन' या विषयावर 14– 16 नोव्हेंबर2022 दरम्यानCIAL-कन्व्हेन्शन सेंटर, कोची, केरळ येथे राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही उद्दिष्टे मुख्यतः यावर भर देतात:



- थीम 1 चाप्रचार आणि समर्थन करणे: भागधारकां मध्येदारिद्र्य मुक्त आणि प्रगत उपजीविकेच्या ग्रामपंचायती.
- मुलभूत पातळीवरविषयवार दृष्टिकोनाद्वारे LSDGs च्या प्रक्रियेला संस्थात्मक करण्यासाठी विविध मॉडेल्सवर PRI सदस्यांच्या तपशिलवार शिक्षणासाठीव्यासपीठ प्रदान करणे.
- स्थानिक प्रशासन बळकट करण्या साठी विविध भागधारकां नामाहिती, कल्पना आणि कृतींची देवाणघेवाण करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- क्षमता-निर्मिती प्रशिक्षणाच्या संदर्भात मूलभूत आणि अनुकरणीय धोरण, दृष्टिकोन, संबोधित अभिसरण क्रिया आणि नाविन्यपूर मॉडेल्सचे प्रदर्शन; विषयवार समस्या आणि चिंतांवरील निराकरण पद्धती; देखरेख फ्रेमवर्क, प्रोत्साहन आणि SDGs च्या थीमचे GPDP मध्ये प्रतिबिंब.

3 दिवसीय कार्यक्रमात, पहिल्या दोन दिवसांमध्ये पॅनेल चर्चेच्या सत्रांचा समावेश आहे.उद्घाटन सत्रासह एकूण सात सत्रे ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनाच्या प्रमुख पैलूंवर लक्ष केंद्रित करण्यासाठी योजण्यात आली होती.सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या GP, कार्यकर्ते आणि स्वयं-मदत गट (SHGs) सदस्य, सरकारी अधिकारी, डोमेन तज्ञ, NGO, UN एजन्सी, शैक्षणिक संस्था आणि वित्तीय संस्था यांच्यातील ERs आणि EWRs प्रत्येक पॅनलमध्ये यांचा समावेश आहे.सत्राचा तपशील पुढीलप्रमाणे:



- उद्घाटन सत्र.
- सीमांतीकरण – समावेश आणि बहु-आयामी गरीबीला संबोधित करणे.
- उत्पन्न वाढीसाठी आणि समाज विकासासाठी SHGs ची क्षमता ओळखणे.
- उपजीविका – उत्पन्न दारिद्र्य दूर करण्या साठी पंचायतींची भूमिका.
- सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण संरक्षणा साठी पंचायतीं मार्फत सुरक्षा जाळे.
- दारिद्र्य-मुक्त आणि प्रगत उपजीविका GP वर केरळ राज्याकडून सर्वोत्तम पद्धती.
- पुढील वाटचाल.

[1] वरिष्ठ सल्लागार (LSDGs), क्षमता निर्माण (CB) विभाग, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार
[2] सल्लागार (RGSA-NPMU) क्षमता निर्माण (CB) विभाग, पंचायती राज मंत्रालय.

मागील अनुभवांवरून असे दिसून आले, की अशा कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अधिक संवादात्मक, प्रभावी आणि आकर्षक पद्धतीची माहिती कमी कालावधीत अधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.ज्यासाठी, सामान्य पॉवरपॉईंट सादरीकरणाऐवजी, ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या थीमच्या विशिष्ट समस्यांवरील 2-3-मिनिटांचे व्हिडिओ माहितीपट सादरीकरण, प्रत्येक भागधारकाकडून वापरले गेले.यानंतर भागधारक आणि पॅनेलमधील सदस्यांमधील प्रश्नोत्तरे सत्राद्वारे आंतर-सांस्कृतिक शैक्षणिक वातावरण प्रणालीला चालना मिळाली.यामुळे PRI भागधारकांमधील नेतृत्व क्षमता वाढते आणि त्यांना त्यांचा प्रथम अनुभव सामायिक करण्यास प्रोत्साहनमिळते.
राष्ट्रीय कार्यशाळेचा तिसरा दिवस सहभागींच्या -केरळच्या जिल्ह्यांमधीलदारिद्र्य निर्मुलन आणि प्रगतउपजीविका थीम अंतर्गत,ERs, EWRs कार्यकर्ते, आणि PRI अधिकारी आणि SHG सदस्य राज्य/केंद्रशासित प्रदेशातील 42 सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी GP च्याफील्ड/एक्सपोजर भेटींसाठी नियुक्त करण्यात आला होता.
राष्ट्रीय कार्यशाळेच्या दोन दिवसांमध्ये SHG गटांनी इतर राज्यांतील गटांसह, केरळ राज्यातील कुडुंबश्री उपक्रमांतर्गत एकूण 50 प्रदर्शन स्टॉल्स उभारले होते.कच्चा माल, खाद्यपदार्थ, गृहसजावट, मसाले, कपडे, दागिने, पर्यटन, कलाकृती इत्यादींसह बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांचे या स्टॉलनी प्रदर्शन केले.



**लक्ष्यित भागधारक:**

तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत LSDG च्या विषयवार दृष्टिकोनाचे ज्ञान आणि माहिती पोहचवणे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे.म्हणून, कार्यशाळेचे प्राथमिक भागधारक ER, GP सचिव आणि SHG सदस्य आहेत.सरकारी अधिकारी, डोमेन तज्ञ, NGO, INGO, शैक्षणिक संस्था आणि वित्तीय संस्था हे दुय्यम भागधारक आहेत.राष्ट्रीय आणि प्रादेशिक माध्यमे तृतीय भागधारक आहेत. त्यामुळे, PRIs च्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी 'संपूर्ण पर्यावरणशास्त्र' दृष्टीकोन साध्य होऊ शकतो.

**निरीक्षणे: समस्या ओळखणे आणि संबोधित करणे**

विविध GPs आणि पारंपारिक स्थानिक संस्था (TLBs) यांनी त्यांच्या संबंधित क्षेत्रातील बहुआयामी दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वीकारलेल्या सर्वोत्तम पद्धती सामायिक करण्यासाठी, एक व्यासपीठ म्हणून कार्यशाळेने काम केले.केरळच्या GPs मार्फत अवलंबलेला उपक्रम जाणून घेऊन त्याचे अनुकरण करण्यासाठी क्षेत्र भेटीद्वारे निवडून आलेल्या प्रतिनिधींची क्षमता देखील वाढवली.

**सीमांतीकरणाला संबोधित करणे:**

• उपेक्षित समुदायांना परवडतील अशा घरांसाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध कमी किमतीची सामग्री वापरणे.
• डिजिटल साक्षरता असुरक्षित गटांकडून ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे विविध सेवांमध्ये प्रवेश सुनिश्चित करते.
• कल्याणकारी उपक्रमांना सहाय्य करण्यासाठी जनरेशन OSR.

**मूलभूत आरोग्य सेवा आणि शिक्षणाची उपलब्धी:**

• उपेक्षित आणि असुरक्षित समुदायांसाठी, विशेषतः वृद्धांसाठी उपायात्मक योजनांची तरतूद.
• गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांच्या आरोग्य सेवेसाठी जीवन चक्र दृष्टिकोन हाती घेणे.
• बहुआयामी दारिद्र्य निर्मूलनासाठी, आरोग्य सुविधा आणि प्राथमिक शिक्षणात प्रवेश आणि त्याचे नियमित निरीक्षण करून अभिसरण योजनाबद्ध दृष्टिकोन स्वीकारणे.

**रोजगार निर्मिती आणि उत्पन्नात वाढ:**

• सौरऊर्जा निर्मितीद्वारे उत्पन्न वाढवणे.
• शेती आणि बिगरशेती उत्पादकता आणि विपणन सुधारण्यासाठी पायाभूत सुविधा आणि यंत्रसामग्री निर्माण करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे.
• उपजीविकेसाठीबचत गटांच्या हस्तकला, हातमाग आणि पारंपारिक कारागिरीमध्ये SHG चा सहभाग.
• अन्न प्रक्रिया, साठवण आणि उत्पादनांचे SHG सदस्यांद्वारे विपणन.

**सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरण संरक्षण:**

• जागरूकता वाढवणे, लाभार्थ्यांची निवड आणि राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (NSAP) योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे.
• शाश्वत उपजीविका निर्माण करणे, स्थलांतर रोखणे, असुरक्षित समुदायांचे आर्थिक संरक्षण आणि मनरेगाद्वारे पर्यावरण संरक्षण.
• आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात लोकांचा सक्रिय सहभाग आणि GPDP मध्ये त्याचा समावेश.
• ग्राम गरिबी निर्मुलन योजना (VPRP) तयार करणे आणि GPDP मध्ये त्याचा समावेश.
• आयआयटी आणि नाबार्डच्या शैक्षणिक आणि वित्तीय संस्थांशी तांत्रिक सहाय्य आणि उत्पन्नाच्या संभाव्य स्त्रोतांचा शोध घेण्याच्या आर्थिक सहाय्यासाठी PRI लिंकेज.
• शाश्वत उपजीविकेच्या संधींसाठी संपतचाललेल्या पारिस्थितिक तंत्रांमध्ये सुधारणा करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, नागरिक आणि सरकार यांची एकत्रित कृती.

**अपेक्षित परिणाम:**

i. विषयवारGPDP तयार करण्यासाठी ERs विशेषतः EWRs आणि SHG सदस्यांमध्ये निर्णयक्षमताआणि नेतृत्व गुणांची वाढ.
ii.स्थानिक क्षेत्र विकासासाठी बदल घडवणारा दुवा तयार करणे.
iii. योजनाबद्ध अभिसरण दृष्टीकोन आणि समाजाच्या सहभागानेOSR निर्मिती, रोजगार निर्मिती आणि उद्योजकता विकासासाठी PRI-SHG अभिसरण.
iv. LSDG लोगो लोकप्रिय करून विषयवार दृष्टिकोनावर जनसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.




****

# ई-गव्हर्नन्ससाठी राष्ट्रीय पुरस्कारांतर्गत पंचायती राज मंत्रालयाच्या e-ग्रामस्वराज (eGramSwaraj) आणि ऑडिट ऑनलाइनने सुवर्ण पुरस्कार जिंकला




पंचायती राज मंत्रालयाच्या ई-पंचायत मिशन मोड प्रोजेक्ट (eGramSwaraj आणि AuditOnline) ने ई-गव्हर्नन्ससाठी राष्ट्रीय पुरस्कारांच्या "डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनच्या सरकारी प्रक्रियेतील उत्कृष्ट री-इंजिनियरिंग" श्रेणी अंतर्गत सुवर्ण पुरस्कार जिंकला आहे.

हा पुरस्कार टीम ई-गव्हर्नन्सने केलेल्या आणि टीम NIC-MoPR नेपाठिंबा दिलेल्या उत्कृष्ट आणि अनुकरणीय कार्याची ओळख आहे.

26 नोव्हेंबर 2022 रोजी, जम्मू येथे ई-गव्हर्नन्सवरील 25 व्या राष्ट्रीय परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्याकडून MoPR चे सहसचिव श्री आलोक प्रेम नगर यांना प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विविध भागधारक, विशेषत: पंचायती राज संस्था ज्यांनी ई-पंचायत अर्ज अतिशय तत्परतेने स्वीकारले, त्यांनी पंचायती राज प्रणाली सक्षम करून आणि ती प्रभावी, पारदर्शक आणि कार्यक्षम बनवून ई-पंचायत मिशन मोड प्रकल्प यशस्वी करण्यात मदत केली आहे.




****

# डॉ. बालन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

पंचायती राज मंत्रालय




**गांधी डेव्हलपमेंट ट्रस्ट, डर्बन, दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षा इला गांधी यांनी डॉ. पी.पी. बालन यांना दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथील फिनिक्स सेटलमेंटमध्ये शांतता आणि सलोखा (2020) साठी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविले.**

डॉ. पी. पी. बालन, सल्लागार, पंचायती राज मंत्रालय यांनी शांतता आणि सलोखा (2020) साठी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकला आहे.हा पुरस्कार गांधी डेव्हलपमेंट ट्रस्ट, डर्बनयांच्याद्वारे आणि ट्रस्टच्या अध्यक्षा इला गांधी यांच्या हस्ते 2 ऑक्टोबर 2022 रोजी दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथील फिनिक्स सेटलमेंट येथील आयोजित कार्यक्रमात डॉ. पी. पी. बालन यांना प्रदान करण्यात आला. त्यांना प्रदान करण्यात आलेल्या सन्मानपत्रात नमुद केले आहे की, "शांतता, मानवाधिकार आणि न्याय यांच्या संवर्धनात प्रामाणिकपणा, मानवता आणि करुणा या मूल्यांच्या आधारे त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत, स्थानिक सरकारमध्ये सहभागी होण्यासाठी गावपातळीवर समाजाच्या सक्षमीकरणाची संरचना, ज्यामुळे त्यांना स्थानिक स्तरावर प्रामाणिकपणे आणि परिश्रमपूर्वक सरकारी सेवा वितरीत करण्यात आणि सर्व उपेक्षित गटांची समावेशकता सुनिश्चित करण्यात रचनात्मक भूमिका बजावता आली".

यापूर्वी हा पुरस्कार नेल्सन मंडेला, दलाई लामा, केनेथ कौंडा इत्यादी राष्ट्रीय नेत्यांना देण्यात आला होता, परंतु यावेळी आयोजकांनी पंचायतीसोबत काम करणाऱ्या व्यक्तीची निवड केली,कारण वास्तविक शांतता स्थानिक समाजातून सुरू होते.समितीने असे मूल्यांकन केले, की विकास उपक्रमांद्वारे सामाजिक स्तरावर घेतलेल्या पुढाकारांमुळे शांततापूर्ण सहजीवनासाठी चांगले परिणाम मिळू शकतात.डॉ. बालन यांच्या योगदानामुळे या पुरस्कारासाठी त्यांचीनिवडझाली.डॉ. बालन यांनी 11 वर्षे KILA चे संचालक म्हणून काम केले आणि चप्परप्पडवू ग्रामपंचायत अध्यक्ष (1995-2000) म्हणूनही पूर्ण 5 वर्षे कार्यकाळ बजावला.पंचायत अध्यक्ष या नात्याने त्यांनी पंचायतीमध्ये नाविन्यपूर्ण कार्यक्रम आणले – सूक्ष्म जलप्रकल्प, एकूण गृहनिर्माण योजना, जलसंधारण कार्यक्रम आणि दावामुक्त पंचायती हे त्यापैकी काही आहेत.लोकसहभागातून पंचायतीमध्ये अनेक उपक्रम राबविण्यात आले. पीपल्स ब्रिज, पीपल्स बस टर्मिनल, विद्यार्थ्यांसाठी खेळाचे मैदान हे त्यापैकी काही आहेत.

### (A) लोकसेतू:-

लोकसेतू ची कथा पंचायतीच्या विकास कार्यात लोकांच्या सहभागाबद्दल बरेच काही सांगते.एक वाहती नदी पंचायतीला दोन भागात विभागते. पलीकडे जाण्यासाठी लोक फेरी सेवेवर अवलंबून असतात.दळणवळणासाठी एकच छोटीशी डबा असल्याने गावकऱ्यांसाठी ही कठीण वेळ होती. नदी दीडशे मीटर रुंद आणि दोन ते तीन मीटर खोल होती.लोकांची तक्रार बराच काळ सोडवता आली नाही. वाढत्या दबावामुळे, पंचायतीने हा प्रश्न सोडवण्यासाठी

राज्य सरकारकडे कॉंक्रीट पूल बांधण्याची मागणी करणारा ठराव सादर केला.सुमारे पाच कोटींहून अधिक खर्च येत असल्याने पंचायतींना यावर काहीच करता आले नाही. आर्थिक अडचणींमुळे राज्य सरकारनेही निधीचे वाटप केले नाही.ग्रामसभेत या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली, ज्यात सभेला उपस्थित असलेल्या ज्येष्ठांनी स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून लाकडी पूल बांधण्याची कल्पना मांडली.लाभार्थी समित्यांची स्थापना करण्यात आली आणि 1 नोव्हेंबर 1996 रोजी, ज्या दिवशी केरळ राज्याची निर्मिती झाली, काम सुरु झाले. प्रचार मोहिमेला सुरुवात झाली. लोकांनी दूरवरून नारळाच्या झाडांचे बुंधे गोळा केले, ज्याचा वापर पुलाचे खांब म्हणून होत होता.स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून नारळाचे खोड नदीच्या खाली अडकवले. त्यानंतर फूटपाथ उभारण्यात आला.पंचायतीने एक पैसाही खर्च न करता, शेकडो स्वयंसेवकांनी स्वेच्छेने पूल बांधण्यासाठी रात्रंदिवस श्रमदान केले आणि 15 नोव्हेंबर 1996 रोजी हा पूल गावकऱ्यांसाठी उत्साहीवातावरणात खुला करण्यात आला.हा पूल आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. केरळमधील IX योजनेसाठी लोकांच्या मोहिमेचीफलश्रुती म्हणून त्याकडे लक्ष वेधले गेले. लोकसहभागाचे ते उत्तम उदाहरण ठरले.दूरदूरवरून लोकांनी पुलाला भेट देऊन त्याचे तंत्रज्ञान आणि समाजाचा सहभाग जाणून घेतला. परदेशातील पर्यटकही ते पाहून प्रभावित झाले.अमेरिकेतील 'झेड' मासिकाने 'मल्याळी लोकांची शक्ती' या मथळ्याखाली पुलाची मुखपृष्ठ कथा प्रकाशित केली.

**लोकसेतू काही महत्वाचे संदेश देतो:**

- लोकसहभाग असेल तर खर्च बयाीच प्रमाणात कमी करता येतो.
- पूल हे नो कॉस्ट ॲक्टिव्हिटीचे उत्तम उदाहरण आहे.
- काम पूर्ण करण्यात अचूकता.
- संसाधनांचा जास्तीत जास्त वापर.
- लोकांची मालकी.
- स्थानिक तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा वापर.
- एका महिन्याच्या अल्प कालावधीत ग्रामसभेची मागणी पूर्ण झाली.

**(B) खटलामुक्त पंचायती :-**

पंचायतींना न्यायालयीन अधिकार नसतानासुद्धा विवाद निवारणासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती, ज्यामध्ये उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली अनेक प्रकरणे परत चालवून परस्पर सामंजस्याने निकाली काढण्यात आली.पंचायतीने पर्यावरण संरक्षणावर लक्ष केंद्रित केले आणि चप्परपवेडू ही जैव विविधततेचीनोंदणी करणारी पहिली पंचायत ठरली.

**(C) सूक्ष्म जलविद्युत प्रकल्प :-**

पंचायतीने सूक्ष्म जलविद्युत प्रकल्प उभारून 25 घरांना वीज उपलब्ध करून दिली. हे प्रचलित कायद्याच्या विरोधात होते.पणहे पंचायतीने केले असल्यानेलोकप्रकल्प म्हणून त्याला मंजुरी देणे हे सरकारचे कर्तव्य बनले.सरकारने नंतर कायद्यात सुधारणा करून, काही अटींसह पंचायतींना वीज निर्मिती करण्याची परवानगी दिली.स्थानिक स्वराज्य संस्था या नात्याने पंचायती त्यांना करावेवाटणारे कोणतेही विकासात्मक काम हातात घेऊ शकतात, हे या घटनेवरून दिसून येते.केरळ सरकारने 1997 मध्ये, विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल पंचायतीला स्वराज ट्रॉफी देऊन सन्मानित केले. डॉ. बालन यांनी केरळ स्थानिक प्रशासन संस्थेचे संचालक (2002-2007 आणि 2011-2017) म्हणूनही काम केले.या काळात ग्रामसभा सदस्यांपासून खासदार आणि आमदारांपर्यंत सर्वांसाठी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. राजकीय पक्षांच्या नेत्यांना पंचायती राजबाबत दिलेले प्रशिक्षण उल्लेखनीय आहे.वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे नेते खांद्याला खांदा लावून,एकाच मंचावरून स्थानिक विकासावर चर्चा करतात हे दुर्मिळ दृश्य आहे. संदेश स्पष्ट आहे: पंचायती राजच्या संपूर्ण पंक्तीमध्ये कोणालाही सोडले जाऊ शकत नाही.KILA ने विकेंद्रीकरणावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम देखील सुरु केले ज्यामध्ये दक्षिण आणि पूर्व आशिया आणि आफ्रिकन देशांतील निवडून आलेले प्रतिनिधी आणि अधिकारी सहभागी झाले.

माध्यमांना विकेंद्रीकरणाला सक्रिय पाठिंबा द्यायचा असल्याने ते देखील संवेदनशील झाले.राज्यांतील उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थी पंचायत निवडणुकांच्या मतदानासाठी पात्र असल्याने त्यांना पंचायती राजविषयी अभिमुखता देण्यात आली. 2 महिन्यांच्या अल्प कालावधीत जवळपास 34,00,000 ग्रामसभा सदस्य संवेदनशील झाले.निवडून आलेल्या प्रतिनिधींना मास्टर ट्रेनर बनवण्यासाठी, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे कार्यक्रम आयोजित करणे हा आणखी एक उपक्रम आहे. त्यात कोणालाही मागे न ठेवता, क्षमता बांधणी ही सर्वसमावेशक होती.डॉ. बालन यांनी नेपाळ आणि श्रीलंका सरकारचे सल्लागार म्हणूनही काम केले आहे. भारतातील पंचायतींनी तयार केलेल्या त्याच योजनेच्या मॉडेलमध्ये श्रीलंकेच्या पूर्व प्रांतीय प्रदेशिय सभेने GPDP तयार केला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून, 2020 सालचा गांधी शांतता पुरस्कार स्थानिक पातळीवर काम केलेल्या व्यक्तीला मिळावा, यावर पुरस्कार निर्णायक समितीचे एकमत झाले.त्यांनी एक शोध समिती स्थापन केली आणि समितीला 6 महिन्यांच्या चौकशी आणि मूल्यांकनानंतर सर्वानुमते व्यक्ती सापडली, ती म्हणजे सध्या पंचायती राज मंत्रालय, नवी दिल्ली येथे वरिष्ठ सल्लागार म्हणून कार्यरत असणारे डॉ. पी. पी. बालन.डॉ. बालन यांच्या स्वागत समारंभात श्री. सुनील कुमार, सचिव, पंचायती राज मंत्रालय म्हणाले की, हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा पुरस्कार नसून पंचायती राज मंत्रालयाचाही आहे.



**पंचायत राज मंत्रालयात सत्कार :**

पंचायती राज मंत्रालयाने 21 ऑक्टोबर 2022 रोजी डॉ. पी. पी. बालन यांना 'महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सामंजस्य पुरस्कार' मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यासाठी एका सत्कार समारंभाचे आयोजन केले होते.श्री सुनील कुमार, सचिव, पंचायती राज मंत्रालय आणि मंत्रालयाच्या इतर वरिष्ठ अधिकार्यांनी डॉ. बालन यांना भारतातील पंचायती राज व्यवस्था बळकट करण्यासाठी आणि त्याद्वारे समाजामध्ये शांतता आणि सद्भावना प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेऊन, हा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

****

# श्री पाटील राज्यमंत्री, पंचायती राज यांनी प्रकल्प संचालित गट पंचायत विकास आराखडा आणि जिल्हा पंचायत विकास



भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने नवी दिल्ली येथे 5 ते 6 जानेवारी 2023 दरम्यान दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले होते.

पंचायत राज मंत्रालयाचे सचिव श्री सुनील कुमार MoPR चे माजी सचिव डॉ. एस.एम. विजयानंद, माजी विशेष सचिव डॉ. बाला प्रसाद आणि श्री आलोक प्रेम नगर, सहसचिव, पंचायत राज मंत्रालय, यांच्या उपस्थितीत केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या दोन दिवसीय कार्यशाळेला देशभरातील जिल्हा पंचायत आणि गट पंचायतींचे निवडून आलेले प्रतिनिधी आणि पदाधिकारी आणि विविध मंत्रालये/विभाग आणि विविध संस्था/सार्वजनिक संस्था जसे की नाबार्ड, इरमा, युनिसेफ इत्यादींच्या प्रतिनिधींसह 650 हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेला संबोधित करताना उपस्थितांना शुभेच्छा दिल्या आणि म्हणाले की राष्ट्रीय कार्यशाळा योग्य वेळी आयोजित केली जात आहे - नवीन वर्षाच्या पहाटे - सबका साथ-सबका विकास, सबका विश्वास-सबका प्रयास या भावनेने, सर्वांना सोबत घेऊन ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजन प्रक्रिया सुरू करा.जिल्हा, गट आणि ग्रामपंचायत स्तरावर काम करून राष्ट्र उभारणी आणि विकासात योगदान देण्याचा आपला सामूहिक संकल्प असला पाहिजे.

श्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी पंचायती राज संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शाश्वत विकास उद्दिष्टांचे स्थानिकीकरण आणि पूर्तता करण्यासाठी सर्व संबंधितांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.त्रिस्तरीय पंचायतींनी सर्व मूलभूत सुविधा निर्माण करून आणि शहर-गाव विभाजन दूर करण्यासाठी, शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा/संधी खेड्यातउपलब्ध करून ग्रामीण भागाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.पंचायती राज मंत्रालयाचे सचिव श्री सुनील कुमार यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प-चालित BPDP आणि DPDP वरील तांत्रिक सत्राचे आयोजन केले होते. त्यांनी अधोरेखित केले की केंद्र सरकार पंचायती राज संस्थांना उपलब्ध करून देत असलेल्या संसाधनांमध्ये सातत्याने सुधारणा होत आहेत आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुदानांमध्ये गट आणि जिल्हा पंचायतींचा समावेश आहे.पंचायत राज मंत्रालयाचे सहसचिव श्री आलोक प्रेम नागर यांनी BPDP आणि DPDP च्या विश्लेषणावर सादरीकरण केले.

****

# पंचायती राज मंत्रालयातर्फे 'ग्रामीण समाजाचे सक्षमीकरण; कोणालाही मागे न सोडता' या विषयावर दोन दिवसीय स्मार्ट ग्राम पंचायत परिषदेचे लखनौमध्ये आयोजन

## पंचायती राज संस्थांनी तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेण्यासाठी खूप मोठी मजल मारली आहे ज्यामुळे अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व येते:- **श्री गिरीराज सिंह**




सरकारच्या तिसर्या स्तरावर म्हणजेच पंचायतींच्या 'किमान सरकार, कमाल प्रशासन' या दृष्टीकोनाला पाठिंबा देण्यासाठी, पंचायती राज मंत्रालयाने 'ग्रामीण समुदायांचे सक्षमीकरण; कोणालाही मागे न सोडता' या विषयावर दोन दिवसीय स्मार्ट ग्राम पंचायत परिषदेचे आयोजन 15-16 सप्टेंबर 2022 दरम्यान लखनौ, उत्तर प्रदेश येथे केले आहे.

आज, राष्ट्रीय स्तरावरील परिषदेच्या उद्घाटन सत्राचे नेतृत्व केंद्रीय ग्रामीण विकास आणि पंचायती राज मंत्री श्री गिरीराज राज सिंह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री योगी आदित्यनाथ आणि पंचायत राज राज्यमंत्री श्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी केले.

आपल्या उद्घाटनपर भाषणात श्री गिरीराज सिंह म्हणाले की, पंचायती राज संस्थांनी (PRIs) तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेण्यासाठी खूप मोठी मजल मारली आहे.'स्मार्ट व्हिलेज' विषयीबोलताना ते म्हणाले, की त्यामध्ये तंत्रज्ञानाद्वारे चालणाऱ्या प्रणाली आणि प्रक्रियांचा समावेश होतो ज्यामुळे अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व येते.श्री सिंह यांनी विद्यमान तंत्रज्ञानाची मांडणी आणि अंमलबजावणी करण्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकार आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या भूमिकेवर भर दिला.यावेळी बोलताना, श्री योगी आदित्यनाथ यांनी 5 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याची भारताच्या महत्वकांक्षेला चालना देण्यासाठी उत्तर प्रदेशमधील PRIs च्या योगदानावर भर दिला.श्री आदित्यनाथ पुढे म्हणाले, की स्मार्ट व्हिलेज निर्मितीचा थेट संबंध स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा, जबाबदार नागरिक आणि वर्तनातील बदलांशी आहे.विविध सरकारी आणि बिगर-सरकारी लोककेंद्रित सेवांच्या तरतूदीसाठी हाय-स्पीड इंटरनेटच्या उपलब्धतेवर त्यांनी भर दिला.

यावेळी बोलताना, श्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी मुलभूत पातळीवर सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दीर्घकालीन कल्याणासाठी आयसीटी, इंटरनेट, जीआयएस आणि रिमोट सेन्सिंगच्या लाभाबद्दल सांगितले.त्यांनी डिजिटल पायाभूत सुविधा, वाढती लोकसंख्या आणि अपरिहार्य जलद शहरीकरण यांच्याशी जुळवून घेताना पंचायतींना सामोरे जावे लागणाऱ्या मागणी-पुरवठा व्यवस्थापनासारख्या आव्हानांवर भर दिला.

यावेळी 'लोकॅलायझेशन ऑफ सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (एलएसडीजी), ई-लर्निंग मॉड्यूल लॉंच' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. (फोटो मेलसोबत जोडले जातील)